म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : नाटक
दा. क्र. : १८८५८

IRBK-0119858

नाटकं
१९८५८
१६१५८३

# स्पर्श अमृताचा

रत्नाकर मतकरी

मॅजेस्टिक बुक स्टॉल

IRBK-0119858

प्रकाशक :

अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव, मुंबई ४.

मुद्रक :

अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.

© सौ. प्रतिभा मतकरी

राधा निवास
टिळक रोड,
दादर, मुंबई १४

पहिली आवृत्ती :
जून १९८३

मुखपृष्ठ :
कमल शेडगे

DRM 841/82
of 10–9–1982

मूल्य :
१५ रुपये

गेल्या एक तपाहून अधिक काळ
माझ्या लिखाणाविषयी आस्था व जिव्हाळा दाखवणारे
माझे ज्येष्ठ प्रकाशक–स्नेही
कै. केशवराव कोठावळे
यांच्या पवित्र स्मृतीस

'स्पर्श अमृताचा' या नाटकाचा पहिला प्रयोग, रविवार दि. १९ सप्टेंबर १९८२ रोजी, सकाळी १० वाजता, शिवाजी मंदिर, दादर, येथे सादर करण्यात आला.

## स्पर्श अमृताचा

दिग्दर्शन, नेपथ्य संकल्पना : रत्नाकर मतकरी
नेपथ्य, प्रकाश योजना : बाबा पार्सेकर
ध्वनिमुद्रण : प्रदीप देशपांडे
ध्वनिसंकेत : दादा परसनाईक
सूत्रधार : गोट्या सावंत

## भूमिका

रोहिणी : मीनल परांजपे
धनंजय : रवींद्र मंकणी
बापू : विनायक पै
मोहन : राजन ताम्हाणे
नंदा : आसावरी तुंगारे। सुप्रिया मतकरी
गिरधर : बाळ बापट
गुणी : कृतांजली सावंत
डॉ. वारंग : शशिकांत शिर्सेकर
माधुरी : ज्योती शेवडे
विमलाबेन : मंगला पर्वते

## निर्मिती

कृतांजली, मुंबई

## अंक पहिला
### प्रवेश पहिला

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. १९८५८ नों. दि. १६।५।८३
वि. नाटक क्र.

( पडदा उघडण्यापूर्वी, काळोखातून, पुढील ओळी ऐकू येतात....

पुनर्वसन म्हणजे काय ? तर रुग्णांना आपलं घरातलं, समाजातलं आणि औद्योगिक क्षेत्रातलं मूळचं स्थान परत मिळावं, यासाठी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या शक्य तेवढं चारचौघांसारखं बनवणं.

— जागतिक आरोग्य संघटना )

( कारंजे गावातले, बापूसाहेब सराफांचे घर. संपन्न, पण जुन्या पद्धतीचे. या घरातली बैठकीची खोली. बाहेरून येण्याचे, आत जाण्याचे, अशी दारे. एक-दोन खिडक्या. माडीवर जाण्यासाठी जिना. भिंतींवर देवादिकांची पारंपरिक चित्रे. सराफांच्या दिवंगत पत्नीचे छायाचित्र इ.
वेळ सायंकाळची. बापूसाहेब ( उतारवयाकडे झुकू लागलेले, पण एके काळचे देखणे, प्रेमळ गृहस्थ ) डेस्कशी बसून हिशेब लिहीत आहेत. पण त्यांचे चित्त मात्र त्या कामाकडे नाही. ते लागले आहे वाट पाहाण्याकडे. मधेच उठून, ते फाटकाशी नजर टाकून येतात.
मोहन — त्यांचा एकवीस वर्षांचा तरुण मुलगा — बाहेरून येतो, चपला काढून कोपऱ्यात ठेवतो. )

बापू : ( किंचित् निराश ) हे काय मोहन — एकटाच आलास ? गिरिधरजी कुठेयत ?
मोहन : नाही आले अजून. डेपोवर चौकशी करून आलो. नगरची एस्टी आज लेट आहे.
बापू : रात्री वणीकरांच्या इथेच मुक्काम नाही केला म्हंजे मिळवली.
मोहन : नाही करायचे. तुम्ही वाट बघाल, हे काय त्यांना ठाऊक नाही ?

बापू : हे लग्न केव्हा एकदा पक्कं होईल्सं झालंय्....

मोहन : त्यात काय ? दिदी वणीकरांना पसंत आहेच. आता देण्यावेण्याचं सहज जमवून टाकतील भावजी.

बापू : दुसरं काही नाही. हा मुलगा एवढा एम्. कॉम्., बँकेचा मॅनेजर, म्हणून जरा वाटतं. नाही तर आपल्यासारख्या नावाजलेल्या सराफांना स्थळांचा काय तोटा पडलाय ?

मोहन : तर ! तुमचीच पसंती पाहिजे !

बापू : नशीबानं एक जावई गिरिधरजींसारखा शिकलासवरलेला मिळाला, तर माईचं नशीब दरिद्री ! पहिल्या बाळंतपणात चालती झाली ! ( डोळे टिपतात. ) आता हिचं नीट जमलं म्हंजे मिळवली !

मोहन : जमेल – ती मंडळी तशी चांगली दिसताहेत. ओढून धरतील असं नाही वाटत.

बापू : नाही – म्हंजे आपण लग्नात खर्चाला मागं पाहाणार नाही ! पण त्या मंडळींनी हावरटासारखं, हेच करा न् तेच द्या म्हटलं तर आपलं डोकं फिरेल ! मग आपल्या-सारखे वाईट आपणच !

( नंदा – सुमारे विशीची तरुणी – दारात येते. )

नंदा : ( दारातूनच ) बापू – दूध आणलंय्.

बापू : आण, आण –

नंदा : भावजी नाही आले ?

बापू : येतील बरं ! नंदाबाई, एकदा तुझ्या दिदीचं लग्न जमल्याचं त्यांनी सांगू दे – मग त्यांना सांगायचं, की धाकट्या बहिणीचंही लगेच जमवून टाका !

नंदा : हे हो काय बापू ? ( बापू हसतात. दुधाचा ग्लास तोंडाला लावतात. )

मोहन : बापू, भावजी आले – ( गिरिधरजी येतात. )

गिरिधर : ( दारातूनच ओरडत ) बापूसाहेब – रोहिणीचं लग्न जमलं ! पेढ्यांचा पुडा घेऊन आलोय !

बापू : सांगताय् काय गिरिधरजी ?

गिरिधर : अहो, ती मंडळी म्हंजे देवमाणसं ! देण्याघेण्याचं काही बोलायलाच तयार नाहीत ! सगळं आपल्यावरच सोपवलंय् ! म्हणतात – तुम्ही खानदानी माणसं ! तुमच्याकडे कसल्या अटी न् तटी ?

बापू : बघा – असं पाहिजे ! ( हाका मारीत ) रोहिणी, अगं लवकर ये – आनंदाची बातमी आहे !

मोहन : दिदी ऽ दिदी ऽ ऽ

( रोहिणी – तेवीसेक वर्षांची देखणी तरुणी – माडीवरून लाजत येऊन उभी

राहाते. )

गिरिधर : ( पेढ्यांचा पुडा तिच्या हातात देत ) घे – ठेव महालक्ष्मीपुढे.

( रोहिणी त्यांच्या पाया पडते. पेढ्यांचा पुडा महालक्ष्मीच्या तसबिरीसमोर नेऊन ठेवते. हात जोडते. बापूंच्या पाया पडते. )

बापू : सुखी हो बेटा. भाग्यवान आहेस तू ! सासर चांगलं गाठलंस ! नवराही चांगला शोधलास !

रोहिणी : ( हलकेच ) ही सगळी तुमची पुण्याई, बापू !

गिरिधर : लग्न पक्कं ठरलंय ! पण प्रत्यक्ष कार्याला अजून अवकाश आहे बरं का ! थोडं थांबावं लागणाराय् ! एक दोनतीन महिने !

मोहन : का ?

गिरिधर : वणीकरांचे जमिनीचे काही तरी कोर्टकज्जे चाललेत. त्यांचा एकदा निकाल लागला की, मग लगेच लग्न करू म्हणताहेत !

बापू : ( हसून ) काय बेटी, निघेल ना धीर आणखी तीन महिने ?

रोहिणी : मला काय, जेवढ्या उशीरा होईल तेवढं बरंच ! मला कुठे घाई आहे, तुम्हाला सोडून जायची ?

बापू : वा गं – तू म्हणशील, अगदी जन्मभर इथे राहायचं ! पण आम्ही बरे तुला ठेवून घेऊ ? नसती धोंड !

रोहिणी : खरं सांगू बापू ? मला एवढ्यात लग्नच करायचं नाहीय् !

बापू : आणखी काय करायचंय् ?

रोहिणी : कॉलेजात जायचंय ! हल्ली तर मुली किती शिकतात ! बीए होतात – एमे होतात !

बापू : आणि लग्नाशिवाय राहातात ! अगं, आपल्या जातीत शिकलेल्या मुलींना नवरे मिळतात का ? त्यापेक्षा जरा आराम कर. एकदा सासरी गेलीस की कुठनं मिळणाराय् आराम ? काय, खरं की नाही जावईबापू ?

गिरिधर : तुम्ही काय ऐकताय् बापू तिचं ! आत्ता आपल्यासमोर कॉलेजात जायच्या गोष्टी करतेय्, पण कालपर्यंत, आडूनआडून शंभरदा वणीकरांची चौकशी करीत होती !

रोहिणी : चला – काही तरीच ! ( घरात पळ काढते. सगळे हसतात. नंदा दुधाचा ग्लास घेऊन तिच्यामागून जाते. )

बापू : ( मग गंभीर होऊन ) खरंच गिरिधरजी, बेटीचं लग्न करायचं, लग्न करायचं, असा इतके दिवस मी ध्यास घेतला होता ! पण आता लग्न जमल्यावर, ती या घरातनं जाणार, या विचारानं पायाखालची जमीन सरकतेय् !

गिरिधर : बरोबर आहे बापूसाहेब – आज इतकी वर्षं तुम्हीच मुलांना आईमागे

वाढवलंत. त्यांचे आई–बाप दोन्ही होऊन! तेव्हा तुमची माया काही वेगळीच असणार!

बापू : होय हो – बेटी गेली की घर मला नुसतं खायला येईल! पण करायचं काय? कर्तव्य आहे!

( काळोख. गिरिधरजी पुढे येतात. प्रकाशझोतात. प्रेक्षकांशी बोलू लागतात. )

गिरिधर : रोहिणीची गोष्ट, खरं म्हंजे, इथेच सुरू झाली....तिचा मेहुणा म्हणून आणि सराफांचा एक हितचिंतक म्हणून मला ती जशी कळली तशी मी तुम्हाला सांगणाराय्. त्यातल्या सगळ्याच प्रसंगांचा काही मी साक्षी नव्हतो – पण तरी कुठून ना कुठून, मला बरंचसं समजत गेलं – तर रोहिणीचं लग्न ठरलं. आता ती दुसऱ्या घरी जाणार, म्हणून बापूंच्या जिवावर आलं. तिलाही ते अवघडच वाटलं. तरीही नवं आयुष्य सुरू होणार, म्हणून तिच्या आनंदाला पारावार नव्हता. पुढले दोन महिने ती त्या आनंदाच्या लाटांवरच तरंगत होती, म्हणा ना!

( काळोख )

( प्रवेश पहिला समाप्त )

## प्रवेश दुसरा

( माडीवरची खोली. वेळ संध्याकाळची. रोहिणी आरशाशी बसली आहे. शेजारी नंदा कपड्यांच्या घड्या घालतेय्. )

नंदा : पाहिलंस दिदी? तुझं लग्न ठरलं, त्याला दोन महिने होऊन गेले – पण या दोन महिन्यात, एकदासुद्धा आपणहून विचारपूस केली नाही वणीकरांनी. विसरून गेले की काय, लग्न ठरल्याचं?

रोहिणी : विसरतील बरे? केसचा निकाल लागला की, आपणहून येऊन सांगतील बघ! आपण कशाला काळजी करायची?

नंदा : पाहा बाई! निदान नवऱ्या मुलानं तरी येऊन भेटून जायला हवं होतं! तुला नाही, तर बापूंना तरी!

रोहिणी : वणीकरांना तू समजलीस काय? ते काय रिकामटेकडे आहेत, तुझ्या-माझ्यासारखे? एवढे बँकेचे मॅनेजर! सबंध नगर शाखेची जबाबदारी त्यांच्यावर

आहे म्हणे! त्यांना कुठनं सवड मिळणार नगरहून कारंजाला यायला?

नंदा : बघ हो — तुसडे नसले स्वभावानं म्हंजे झालं!

रोहिणी : तुसडे कशानं? मला तर चांगले मनमिळावू वाटले! (जीभ चावते.)

नंदा : म्हंजे? तुला भेटले होते की काय?

रोहिणी : (हसत) नाही गं — खरंच नाही —

नंदा : दिदी — खोटं नको बोलूस — भेटले होते ना वणीकर?

रोहिणी : फक्त दोनदाच, भावजींच्या इथे गेले होते तेव्हा. मुद्दाम ठरवून नाही काही. — असेच जाताजाता अकोल्याला थांबले होते. ते आले.

नंदा : ते आले —? आणि आम्हाला सांगितलं नाहीस?

रोहिणी : तुम्ही चेष्टा कराल म्हणून नाही सांगितलं! खूप चांगले आहेत गं ते! एवढे मोठे बँकेचे मॅनेजर, पण इतके साधे! बोलणंसुद्धा इतकं गोड — !

नंदा : होऽ, सासरची सगळी माणसं तशीच गोड असली म्हंजे मिळवली. नाही तर सासूबाई निघायच्या खाष्ट!

रोहिणी : कशाही असू देत. मी करीन त्यांना आपलंसं. आजवर आईची माया मिळाली नाही, आता सासूबाईंनाच आई मानायचं ठरवलंय्.

नंदा : म्हंजे? तू न् वणीकर — वेगळं घर नाही वाटतं करणार?

रोहिणी : अं हं! मला आवडतं मोठं कुटुंब! मी सगळ्यांचं काम मन लावून करीन! सासरी म्हटलं पाहिजे की, पाहा बापूसाहेब सराफांच्या घरचं वळण!

नंदा : दिदी — आरशात काय गं पाहातेयस सत्रांदा?

रोहिणी : कुठे बघतेय्? उगाच काही तरी!

नंदा : बाकी दिदी, लग्न ठरल्यापासनं तुझ्यात चांगलाच फरक पडलाय् हो! गालावर लाली केवढी चढलीय्!

रोहिणी : होय गं, गेले पंधरा दिवस असेच दिसताहेत गाल! रोज रात्री झोपताना कोल्ड क्रीम लावते! पण काही फरक नाही!

नंदा : कशाला लावतेस कोल्ड क्रीम? छान दिसतात असेच! नाटकात रंगवल्यासारखे! आधीच लोक तुला माझ्यापेक्षा सुंदर म्हणतात! आता तर काय, चित्रातल्यासारखे गुलाबी गाल! म्हंजे अप्सराच म्हणतील! (खाली, गिरिधरजी बाहेरून येतात.) गालावर कसे गुलाब फुललेत!

गिरिधर : मोहन, ए मोहन — (मोहन बाहेर येतो.) रोहिणी कुठाय?

मोहन : माडीवर असेल. दिदीऽ, भावजी आलेयत्.

(रोहिणी आणि नंदा खाली उतरून येतात.)

नंदा : भावजी — हे पाहिलंत — दिदीच्या —

मोहन : मग? दिवसच आहेत तिचे! साध्या नाही — काश्मीरी गुलाबाचे!

रोहिणी : चेष्टा नको रे करूस. खरंच गिरिधरजी, काय असेल हो हे ?
गिरिधर : बघू ? ( रोहिणीला ) इकडे उजेडाकडे तोंड कर !
रोहिणी : माझ्या कानात काही फरक दिसतो ?
मोहन : लांब झालेले दिसतात ! ( नंदा हसते )
रोहिणी : तू गप रे – भावजी, कानाच्या पाळ्या सुजल्यासारख्या वाटतात ?
गिरिधर : काही नाही. व्हिटॅमिन डेफीशिअन्सी असेल, दुसरं काय ?
रोहिणी : सुटले ! काय घाबरले होते ! म्हटलं, काय असेल न् काय नाही ! त्यातनं बापूंनी मला इतकं घाबरवून सोडलं होतं – परवा डॉक्टरकडे घेऊन गेले – त्यांना काय ? आयतंच कुळ मिळालं – त्यांनी सगळे रिपोर्ट्स काढायला लावले न् बापूंना म्हणाले, अकोल्याला दाखवून आणा स्पेशालिस्टला !
गिरिधर : एक बातमी द्यायला मुद्दाम आलो होतो – बापू कुठायत ?
नंदा : अकोल्याला गेलेयत – पण आम्हाला सांगा की.
गिरिधर : बातमी भलतीच आनंदाची आहे. वणीकरांच्या केसचा निकाल लागला !
मोहन : खरं की काय ? जिंकले ना ते ?
गिरिधर : जिंकले तर – मंडळी भलतीच खुषीत आहेत. म्हणताहेत, येणाऱ्या सुनेचा पायगुण चांगला !
रोहिणी : हो – म्हणजे हरले असते, तर मला अपशकुनी ठरवणार होते !
गिरिधर : काही ना असेना, आत्तापासून तुझ्याविषयी सासरी मत चांगलं झालंय्, हे महत्त्वाचं !
नंदा : म्हणजे आता लगेच लगीनघाई सुरू व्हायची ना ? मजा आहे दिदी तुझी !
रोहिणी : बरं झालं भावजी, नाही तर माझं लग्न कधी व्हायचं याची नंदेला कोण काळजी पडली होती ! म्हणत होती, दोन महिने होऊन गेले —
नंदा : वा गं ! मी कशाला काळजी करू ?
गिरिधर : का नाही ? रोहिणीनंतर आता तुझाच तर नंबर !
मोहन : मग ? कधीचा मुहूर्त ठरवलाय् ?
( बापू येतात. ते थकल्यासारखे दिसताहेत. )
मोहन : बापू – ( पुढे होतो. )
गिरिधर : बापूसाहेब, तब्येत बरी आहे ना ?
बापू : बरी आहे.
गिरिधर : अकोल्याला गेला होतातसं कळलं. प्रवासाचा त्रास झाला वाटतं ? चेहरा उतरलेला दिसतोय् ?
नंदा : चहा ठेवू बापू ?
बापू : नको. तुम्ही सगळे जा पाहू. मला जरा शांत बसू द्या.

नंदा : बापू, भावजी म्हणताहेत, लग्नाची तारीख ठरलीसुद्धा!

बापू : (किंचित् चिडून) ठरू दे. तू जा.

(ती आश्चर्यचकित, हिरमुसली होऊन निघून जाते. रोहिणी आणि मोहनही जातात.)

जावईबापू, तुम्ही थांबा इथेच!

गिरिधर : केसचा निकाल वणीकरांच्या बाजूनं लागला. लगेच लग्नाची तारीख ठरवली. [या महिन्याची सत्तावीस तारीख. म्हणजे अजून बावीस दिवस आहेत. तशी थोडी घाईच होणाराय्. पण लग्न म्हंजे काय, चार महिने आधी ठरलं तरी शेवटी घाई ती घाईच!

बापू : जावईबापू, हा मुहूर्त जाऊ द्या!

गिरिधर : (चकित) का? एकदा हा मुहूर्त टळला की, नंतर आणखी महिनाभर –

बापू : ठीक आहे. जेवढं लांबणीवर पडेल तेवढं चांगलंच!

गिरिधर : पण आधीच दोनअडीच महिने उशीर —

बापू : खरं सांगू? वणीकर आणखी वर्ष–दोन वर्षं थांबत असले तर पाहा!

गिरिधर : असं काय बोलताय् बापूसाहेब?

बापू : माझा विचार बदललाय् जावईबापू. मी बेटीला आणखी शिकवायचं ठरवलंय्!

गिरिधर : हे काय मधेच काढलंत? आजवर तुम्हीच तर म्हणत आलात की, एसेस्सी झाली, पुष्कळ झालं! आणखी शिकून करायचंय् काय?

बापू : (पडल्या आवाजात) माझी चूक होती ती! बेटीला शिकायची किती आवड आहे हे मी लक्षातच घेतलं नव्हतं!

गिरिधर : पण लग्न झाल्यानंतर नाही का ती कॉलेजात जाऊ शकणार? वणीकरांची माणसं तशी —

बापू : त्यात काही अर्थ नाही. एकदा संसार सुरू झाला की, मग काय लक्ष लागणार अभ्यासाकडे?

गिरिधर : मला नाही वाटत ती मंडळी वर्ष–दोन वर्षं थांबायला तयार होतील, असं.

बापू : तसं असेल तर आपण या स्थळाचा विचार डोक्यातून काढूनच टाकलेला बरा!

गिरिधर : (अतिशयच आश्चर्यचकित) म्हणताय् काय बापूसाहेब? इतकं चांगलं स्थळ हातचं घालवायचं?

बापू : तुम्ही काहीही म्हणा जावईबापू, पण माझं ठरलं ते ठरलं. स्थळ काय, हे नाही, दुसरं मिळेल. बेटीचं शिक्षण मात्र एकदा राहिलं, तर कायमचं राहूनच जाईल!

गिरिधर : पण आता त्या माणसांना तोंडघशी पाडल्यासारखं नाही का होणार?

बापू : तुम्ही त्या मंडळींची कशीही समजूत घाला, गिरिधरजी ! पण हे लग्न होणं शक्य नाही ! निदान एवढ्यात तरी नाहीच नाही !

गिरिधर : ठीक आहे ! नंतर तुमचा विचार बदलला तर कळवा – ( मग न राहावून ) खरंच बापूसाहेब, तुम्हाला झालंय् काय ? एकदम तुम्ही इतके कसे बदललात ? मला वाटलं होतं, मुहूर्त ठरल्याचं कळल्यावर तुम्ही आनंदानं घर दणाणून सोडाल ! आणि तुमच्या तोंडात, लग्न मोडण्याची भाषा ?

बापू : माझा नाइलाज आहे, जावईबापू.

गिरिधर : मी येतो. तुमची मनःस्थिती ठीक नाही. आपण नंतर बोलू. ( अस्वस्थपणे जातात. )

( बापू कसेबसे माडीवर जातात. खचल्यासारखे कॉटवर बसून राहातात. काही क्षणांनी रोहिणी बाहेर येते. बैठकीत बापू दिसत नाहीत, म्हणून माडीवर जाते. )

रोहिणी : ( हलकेच ) बापू —

बापू : हं —

रोहिणी : काळोखात काय बसलाय् ? दिवा लावू ?

बापू : कशाला ?

रोहिणी : भावजी गेले ?

बापू : हं.

रोहिणी : बोलत का नाही बापू — ? काय झालं ?

बापू : काही नाही.

रोहिणी : नक्कीच काही तरी झालंय. माझ्या लग्नाचं काही —

बापू : ते लांबणीवर टाकलं ! तू शिकायचं म्हणत होतीस ना ? म्हणून !

रोहिणी : म्हणजे जवळजवळ मोडलंच ना ?

बापू : बेटी — ! ( थांबून ) हो बेटी, जवळजवळ तसंच !

रोहिणी : का मोडलं बापू ? बापू, मला खरं कारण सांगा — मी वाईट वाटून घ्यायची नाही....दुःख करायची नाही. पण मला खरं खरं सांगा. वणीकरांविषयी काही वाईट कळलं का ? ( ते नकारार्थी मान हलवतात. ) मग — ? आज तुम्ही अकोल्याला गेला होता — माझे रिपोर्ट्स घेऊन – तिथे काही कळलं का ? डॉक्टरीणबाई काय म्हणाल्या ?

बापू : त्या म्हणाल्या, एवढ्यात लग्न नको. ( थांबून ) तू काही काळजी करू नकोस बेटी. आपण पुढे दुसरं स्थळ शोधू. याच्यापेक्षा अधिक चांगलं.

रोहिणी : ( विलक्षण भीतीनं ) मला काय झालंय् बापू ? खरं सांगा — मला कसला आजार झालाय् ?

बापू : काही नाही बेटी — तू बरी होशील —

रोहिणी : माझ्यापासून लपवू नका बापू. सांगा ना – मला काय झालंय् ?

बापू : बेटी, बेटी – मला सांगायला लावू नकोस !

रोहिणी : बापू ऽ ( भीतीनं भ्रमिष्ट झाल्यासारखी, आरशात स्वतःची कातडी पाहू लागते — भान हरपून ) बापू ऽ बापू ऽ —

बापू : ( तिच्या पाठीवरून हात फिरवीत ) रडू नकोस बेटी — शांत हो — ( रोहिणी दचकून विजेसारखी दूर होते. )

रोहिणी : मला हात लावू नका बापू — मला हात लावू नका ! नाही तर तुम्हाला-सुद्धा —

( काळोख )

( प्रवेश दुसरा समाप्त )

## प्रवेश तिसरा

( बैठकीची खोली. नंदा व मोहन. )

नंदा : गेले सहा महिने मी बघतेय् मोहन — बापूंचं काही समजतच नाही. लग्न मोडलं, न् दिदीला कॉलेजात घातली — कशाकरता ? असे काय शिकून मोठे दिवे लावायचेत ?

मोहन : अगं, पण तुला–मला कळतं, ते बापूंना कळत नसेल का ?

नंदा : — आणि त्या बाईंनीदेखील अभ्यासाचं भयंकर मनावर घेतलंय् ! पाहावं तेव्हा आपलं पुस्तकात डोकं ! म्हंजे, याचा अर्थ काय ?

मोहन : आपल्याला कशाला पंचाईत ? तिची ती पुस्तकं आणते — वाचते ! तुला–मला काही त्रास आहे का ?

नंदा : तसं नाही रे — पण हिला एकदम कुठनं इतकं वेड लागलं वाचनाचं ? मी बघतेय् — आपल्यात मिसळतसुद्धा नाही हल्ली पूर्वीसारखी.

मोहन : असेल. मला काही माहीत नाही.

नंदा : मोहन, तू काही तरी लपवतोय्स — दिदीला काय झालंय् ते —

मोहन : ( रोहिणीला येताना पाहून ) गप्प बस —

(रोहिणी दोनतीन पुस्तकं घेऊन येते.)

रोहिणी : मोहन, एवढी पुस्तकं परत करशील लायब्ररीत? आज शेवटची तारीख आहे — मला थोडं थकल्यासारखं झालंय म्हणून सांगते —

मोहन : शेजारच्याच लायब्ररीची आहेत ना? आत्ता आणतो बदलून.

रोहिणी : नवीन कुठली आणायची, त्यांची यादीही ठेवलीय आत.

नंदा : मोहन, काल भावजी आले होते, ते काय रे म्हणत होते?

मोहन : काही नाही गं विशेष —

नंदा : नाही कसं? बापूंशी चांगली खडाजंगी झाली त्यांची. मी चहा घेऊन गेले, तर तोसुद्धा न पिता तावातावानं निघून गेले!

मोहन : काही नाही गं — भावजींनी स्थळं आणली होती दोघींकरता, वार्शीची.

(त्याला एकदम हसू येतं.)

नंदा : हसायला काय झालं?

मोहन : अगं, बापू म्हणाले की, वार्शीच्या सासवा खाष्ट असतात — आम्हाला नकोत ही स्थळं!

नंदा : म्हंजे दोन्हीच्या दोन्ही स्थळं नाकारली?

मोहन : हो. मी जातो.

नंदा : पण का? दिदीला एक वेळ नको असेल लग्न! — ती शिकतेय् ना कॉलेजात! पण माझं काय आहे? ना शिक्षण, ना नोकरी! मग मला विचारायचं तरी, वार्शीच्या स्थळांना नकार देताना.

मोहन : जाऊ दे गं. एवढं काय मनाला लावून घेतेस? मी आलोच हां. (जातो)

(क्षणभर स्तब्धता.)

रोहिणी : नंदा, हल्ली काम फार पडतं नाही तुला? माझं कॉलेज — त्यातनं अधनं-मधनं माझी तब्येत बरी नसते.

नंदा : चालायचंच! दुसरं आहे कोण घरात बाईमाणूस? मलाच करायला हवं सगळं. पण कधीकधी वाटतं की, तुझ्यासारखी मीही कॉलेजला गेले असते, तर तेवढीच सुटका झाली असती. बापूंनी जाऊ दिलं असतं तर म्हणा! नाही तर म्हणाले असते, घराकडे बघायला कुणी नाही — तू जायचं नाहीस कुठे!

रोहिणी : असं का म्हणतेस? माझ्याइतकंच तुझ्याविषयी वाटतं बापूंना!

नंदा : कोण जाणे! सध्या तरी त्यांना तुझ्याशिवाय दुसरं कुणीच दिसत नाहीय!

रोहिणी : त्याला त्यांचाही नाइलाज आहे, नंदा! कसं सांगू तुला –

(बापू बाहेर जायच्या तयारीत येतात.)

बापू : मी दुकानावर जातो गं. नंदा, येताना काही आणायचं असलं तर यादी न् पिशव्या दे.

नंदा : देते. ( आत जाते. )
बापू : बेटी, आता कसं वाटतंय् तुला ?
रोहिणी : थोडं थकल्यासारखं झालंय. बाकी नाही नाही.
बापू : तू पड बरं वर. चल.
( तिला माडीवर घेऊन जातात. )
रोहिणी : बापू, मलाच का झाला हा रोग ? आपल्या घराण्यात पूर्वी कुणाला —
बापू : नाही. कुणालाच नव्हता. अगं, तसं नसतंच ते. हा रोग कधीही कुणालाही होऊ शकतो ! आता झोप बरं.
रोहिणी : बापू, एक विचारू ? भावजींनी स्थळ आणलं असेल, तर खरंच नंदीचं का नाही जमवून टाकत ? माझं लग्न एक राहिलं, पण तिचं कशाला आणखी मागे ठेवायचं ?
बापू : वा गं ! मोठीच्या आधी धाकटीचं केलं, तर लोक काय म्हणतील ? मग तुझं लग्न राहूनच जाईल ते ?
रोहिणी : माझ्या लग्नाचा आता प्रश्नच कुठे येतो बापू ? मी या आजारातून जगले–वाचले, तरी पुष्कळ झालं ! लग्नबिग्न आता मी साफ विसरलं पाहिजे....
बापू : असं नाही बोलायचं बेटी ! आत्ता वर्ष–दोन वर्षांत बरी होशील बघ तू. मग तुझं लग्न करू, न् नंतर नंदाचं !
रोहिणी : म्हंजे मी बरी होईपर्यंत नंदानं थांबायचं ?
बापू : असं काय मोठं वय वाया चाललंय् तिचं ?
रोहिणी : पण बापू — मी कधीच बरी झाले नाही तर ?
बापू : कोण म्हणतं, तू बरी होणार नाहीस ? काय वाट्टेल ते झालं, तरी मी तुला बरी केल्याशिवाय राहाणार नाही ! तुझा माझ्यावर विश्वास आहे ना ?
रोहिणी : बापू, तुमच्यावर विश्वास नसता, तर कुष्ठरोग झाल्याचं कळलं, त्याच वेळी मी जिवाचं बरंवाईट करून घेतलं असतं. मला एकटीला – हे सहनच झालं नसतं हो !
बापू : शांत हो बेटी ! मी आहे तोवर तू कधीच एकटी पडणार नाहीस. मी तुला कधीच अंतर देणार नाही बेटी – कधीच नाही !
( क्षणभर ते तिच्या डोक्यावर थोपटत राहातात. नंदा बैठकीत येते. )
नंदा : ( माडीच्या दिशेनं हाक मारीत ) बापू ऽ, पिशव्या आणि यादी आणलीय्.
बापू : आलो ऽ ....
( माडी उतरून येतात. तेवढ्यात मोहन बाहेरून येतो. बापू नंदाकडून पिशव्या आणि यादी घेऊन बाहेर जातात. नंदा घरात जाते. मोहन माडीवर येतो. )
मोहन : दिदी, ही तुझी पुस्तकं.

(ती त्याच्याकडून घेऊन पुस्तकं चाळू लागते. तो तिच्यासमोर बसतो.)

दिदी, नंदी लग्नाबद्दल काहीही म्हणाली, तरी तू नाही हं मनावर घ्यायचं.

रोहिणी : नाही घेणार. अरे, तिचा काय दोष? तिला खरा प्रकार माहीत नाही. तुलाही नाही.

मोहन : (हलकेच) मला माहीत आहे दिदी. अंदाजाअंदाजानंच कळत गेलं. पण मी कुणाला सांगणार नाही –

रोहिणी : मोहन – तुला हे माहीताय्? तरी तू जेवताना तुझा पाट माझ्याशेजारी मांडू देतोस?

मोहन : मग काय झालं? तुझ्याऐवजी मला रोग झाला असता, तर तू माझा तिटकारा केला असतास?

रोहिणी : पुरे मोहन! अभद्र नको बोलूस!

मोहन : आणि बापू –? ते तर आपणहून तुझं सगळं हौसेनं करतात. न कंटाळता, – न चिडता!

रोहिणी : मी मात्र त्यांना नुसतं दुःखच द्यायला जन्मलेय्!

मोहन : बाकी दिदी, हल्ली तुझा चेहरा खूपच छान दिसतो हं! पूर्वीपेक्षा सुंदर! तुला नाही कळलं? बघतेस तरी का आरशात? बघ – बघ –

रोहिणी : मला? मला कसं कळेल मोहन? आरशात मला आत्ताचा सुंदर चेहरा दिसतोच कुठे? त्या जागी मला दिसतो, तो पुढे होणारा विद्रूप चेहरा! आजचे हे माझे हात, पाय, नाक, डोळे – उद्या यातलं काय झडून नाहीसं होईल कोण जाणे! मोहन, आज तू माझ्याशी मायेनं बोलतोयस – उद्या तू माझ्या विद्रूप चेहऱ्याला घाबरून दूर पळशील. मी एकटीच राहीन! एकटीच – झडून, सडून मरेन – एकटीच —

(तिला रडू अनावर होतं.)

(सावकाश काळोख.)

(प्रकाशझोतात गिरिधरजी येतात.)

गिरिधर : अशी चार वर्षं गेली....रोहिणीचा आजार वाढतच गेला....ती खिडकीतून पाहायची – झाडाची पानं गळताना...पानं झडत झडत जाऊन ती झाडं पुरती उघडी बोडकी होताना. वसंत आल्याबरोबर, ती झाडं पानांफुलांनी डंवरून यायची. पण ते भाग्य आमच्या रोहिणीच्या नशीबी कुठलं? तिची दिवसादिवसागणिक पानगळच चालू होती....

(काळोख)

(प्रवेश तिसरा समाप्त)

## प्रवेश चौथा

(बैठकीची खोली. मोहन डेस्कशी बसला आहे. नंदा माडीवरून धावतच येते. तिच्या हातात वाळलेले कपडे. ती मोलकरणीच्या नावानं ओरडते आहे.)

नंदा : गिरिजाबाई – गिरिजाबाई – माझे कपडे माडीवर कुणी वाळत घातले ?

मोहन : कशाला ओरडतेयस नंदा, गिरिजाबाईंच्या नावानं ? त्या परवाच काम सोडून गेल्या – लक्षात नाही तुझ्या ?

नंदा : खरंच ! मग माझे कपडे वरती कुणी वाळत घातले ?

मोहन : मी घातले. खाली जागा नव्हती दोन दिवसांच्या कपड्यांना, म्हणून माडीवर घातले.

नंदा : छान केलंस ! आता परत धुवायला हवेत हे वाळलेले कपडे !

मोहन : कशाला ? माडीवर वाळले तर काय झालं ?

नंदा : अरे – तिथे ती बसते ना ! मला नाही त्या खोलीत कपडे वाळवायचे ! (एकदम) मला भीती वाटते रे मोहन – मला दिदीसारखा कुष्ठरोग झाला तर ? या विचारानं मला रात्री झोपसुद्धा येत नाही. स्वप्नं पडतात, तीसुद्धा बोटं गळून गेल्याची ! चेहरा सुजून भप्प झाल्याची.

मोहन : वेडीच आहेस. असा काही संसर्गानं लागणाऱ्यातला नाहीय् दिदीचा रोग.

नंदा : मोहन, गिरिजाबाई का काम सोडून गेली ?

मोहन : मला नाही माहीत.

नंदा : मी सांगते. तिला हे कळलं असेल. दिदीच्या रोगाचं.

मोहन : काही तरी काय बोलतेस ?

नंदा : चार वर्षं झाली आता दिदीला रोग लागला त्याला. कितीही लपवलं, तरी ते एव्हाना लोकांना कळलंच असेल.

मोहन : नाही नंदा – हे गावभर होऊन मुळीच चालायचं नाही.

नंदा : होईल कशाला ? होतंच आहे. बापूंनी मारे चालून आलेली स्थळं नाकारली. – उद्या दिदीच्या रोगाचं लोकांना समजलं, तर आपली लग्नं होणं शक्य तरी आहे का ? मी सांगते मोहन – दिदीला कुष्ठधामातच धाडायला हवं. आपण तिचा संबंध कायमचा तोडायला हवा, आणि —

मोहन : आणि काय ?

नंदा : लोकांना सांगायला हवं की, ती वारली !

मोहन : नंदा – किती भयंकर बोलतेस !
नंदा : भयंकर वाटतंय् तुला ! पण असं केलं तरच आपली धडगत आहे ! नाही तर सगळं घर धुळीला मिळेल !
मोहन : काहीही होऊ दे ! बापू तिला कुष्ठधामात पाठवायला कधीच तयार होणार नाहीत !
(रोहिणी येते. तिच्यानं चालवत नाही, इतका ताप अंगात आहे. हातां-पायांवर गाठी आल्यामुळे असेल, पण तिनं हात पदरानं पुरते झाकून घेतलेले आहेत. बापू तिला धरून घेऊन येतात. ती आल्याआल्या खाली बसते.)
मोहन : हे काय दिदी, बैठकीवर बस ना आरामात.
रोहिणी : नको – नंदानं आजच चादर बदललीय्.
बापू : काही होत नाही चादरीला. तू बस तिथे.
(तिला हाताला धरून बैठकीवर बसवतात)
नंदा : (पुटपुटत) मग आधीच बसायचं होतं बैठकीवर !
बापू : नंदा — तू चहा आण बघू. (ती जाते. रोहिणीला) बघ – किती थकलीस ! तरी सांगत होतो, परीक्षेला बसू नकोस.
रोहिणी : बापू, आजार आता कायमच माझ्या सोबतीला आहे. त्यासाठी परीक्षा चुकवून कसं चालेल ? अंगात किती का ताप असेना, परीक्षा नाही चुकवायची.
मोहन : शाब्बास दिदी ! असं पाहिजे !
बापू : गेली चार वर्षं बघतोय – प्रत्येक परीक्षेच्या वेळी, नेमकी तुला रिॲक्शन ! अगदी सोबत म्हणून बोलावल्यासारखी ! – तू तरी किती सोसशील !
रोहिणी : खरं सांगू बापू ? आजारपणामुळे पेपर उलट अधिक चांगले लिहिता येतात. शरीराचं दुःख विसरायचं असेल, तर सारं चित्त पेपरमधे घालणं भाग पडतं. आज अंगभर गाठी ठुसठुसत होत्या. भयंकर ठणका लागला होता. पेपर लिहिण्यात सारं लक्ष घातलं, तेव्हा कुठे ते सहन झालं....
(नंदा चहाचे दोन कप घेऊन येते. एक बापूंना देते, दुसरा घ्यायला रोहिणी हात पुढे करते, पण नंदा कप तिच्या हातात न देता खाली ठेवते. बापू पाहात राहातात. रोहिणी कप उचलते.)
बापू : (वातावरणातील ताण कमी करण्यासाठी) मोहन, ते दुपारचं पार्सल आण बघू – (तो जातो.)
रोहिणी : या वेळी रिॲक्शन जरा अधिकच जोराची आली.
बापू : नोव्हॅट्रोनचा ओव्हरडोस झाला ! यापुढे रोज एकच गोळी घ्या म्हणाले डॉक्टर ! आणि मी मारे वशिला लावून अकोल्याहून हजार गोळ्या आणवल्या !
रोहिणी : (उदास हसून) रोज एक घ्यायची, तरी हजार गोळ्या लागतीलच !

नंदा : त्यापेक्षा बापू, दिदीला कुष्ठधामातच का नाही ठेवत ? तिथे तिला चांगली ट्रीटमेंट मिळेल ! पाहिजेत ती औषधं मिळतील !

बापू : नंदे, तुला कुणी विचारलंय् ? तू जा बघू इथून ?

(नंदा हिरमुसली होऊन निघून जाते.)

रोहिणी : बापू, उगाच रागावलात तुम्ही नंदेवर. ती या रोगाला घाबरते. सगळेच घाबरतात. कुणाकुणावर रागावणार तुम्ही ?

(मोहन पिशवी घेऊन येतो.)

मोहन : हे घ्या बापू.

बापू : (पिशवीतून एक पार्सल बाहेर काढीत) बेटी, आज दुपारी तुझ्यासाठी आणून ठेवलं होतं.

रोहिणी : काय आहे ते ?

बापू : पोलकं आहे, लांब बाह्यांचं. गाठी येतील तेव्हा घाल. म्हंजे हे असे पदरानं हात झाकावे लागणार नाहीत.

मोहन : (एक लहानशी पातळ गादी दाखवत) ही गादी बघ दिदी – सावरीच्या कापसाची आहे.

रोहिणी : ही कशाला आणली ?

बापू : अगं, आज तुझ्या परीक्षेच्या इथली बाकं बघितली, तेव्हा लक्षात आलं, तुझ्या अंगभर गाठी आलेल्या ! कशी बसली असशील त्या कठीण लाकडावर ! उद्या ही गादी घेऊन जा बाकावर घालायला.

रोहिणी : बापू – कशाला इतकी माया करता माझ्यावर ?

(गिरिधरजी येतात.)

गिरिधर : काय म्हणतेय रोहिणीची तब्येत ?

बापू : परीक्षा चालू आहे ना – थोडा त्रास होतोय् !

गिरिधर : बहाद्दर आहे. बघताबघता चार वर्षं अभ्यास केला या आजारासकट ! आत्ता ग्रॅजुएट होईल !

रोहिणी : म्हंजे मोट्ठी पोकळी तयार होईल ! विचार केला की भीती वाटते. आता करायचं काय रिकाम्या वेळाचं ? साधं घरकामसुद्धा कोणी मला करू देणार नाही !

गिरिधर : असं आता वाटतंय् – पण नंतर काही तरी मार्ग निघेलच !

रोहिणी : काय निघणार ? भावजी, आमच्या अभ्यासात एक कविता आहे – झाडाची पानं गळताना कवीला कसं उदास वाटतं ते सांगणारी. गिरिधरजी, पानगळ पाहाणाऱ्याला जर इतकं उदास वाटतं, तर स्वतः त्या झाडाला काय वाटत असेल ?

बापू : हे असले विचार काढून टाक पाहू डोक्यातनं ! एसेस्सीनंतर चूल-मूल करीत

बसणार होतीस, ती या आजारपणाच्या निमित्तानं बी. ए. झालीस – उद्या एम्. ए. होशील.

रोहिणी : बापू, बी. ए. चं न् एम. ए. चं कौतुक कुणाला? चारचौघा धडधाकट माणसांना! त्या चारचौघांच्या जगापासून तर मी दिवसेंदिवस दूर दूर चालल्येय्! नंदा म्हणाली तेच बरोबर बापू – मला तुमच्या जगात जागा नाहीय्! तरी मी हट्टानं इथे – या घरात राहातेय्.

मोहन : नंदेच्या बोलण्याकडे तू काय लक्ष देतेस? तिला लागलंय् वेड! खरंच भावजी, हल्ली ती अगदी भ्रमात असल्यासारखी करते. स्वतःच्या वस्तू कुलुपात काय ठेवते, भिंती काय पुसत बसते – काही विचारू नका.

रोहिणी : ती बोलत नाही – पण मला माहीताय्! माझ्यामुळे तिचं लग्न लांबलं, याचा राग धरलाय् तिनं माझ्यावर! खरंच भावजी, नंदीसाठी एखादं स्थळ बघा ना हो!

बापू : बेटी, आता बघतोच आहोत आम्ही तिच्यासाठी स्थळं. पण एकदम कसं जमणार? जमेल तेव्हा जमेल.

रोहिणी : बापू, मी पडते जरा वर जाऊन.

बापू : जाववेल ना? का मोहनला येऊ दे बरोबर?

रोहिणी : नको. मी जाईन! (जाते.)

बापू : जावईबापू, आज एक नवीन औषध समजलंय् बेटीच्या आजारावर. घरगुती आहे. एक म्हातारी बाई आहे – ती पांढरा पांगारा कुटून त्याचा रस काढून देते. तो फक्त सात दिवस –

गिरिधर : बापूसाहेब, ही असली औषधं देणं आता बंद करा. ती महागडी इंजेक्शन्स देताय्, तीही बंद करा.

बापू : जावईबापू – !

गिरिधर : रोहिणीसमोर सांगणं जिवावर येत होतं. पण, मला वाटतं, या असल्या उपचारांनी तिचा रोग उलट वाढत चाललाय्!

बापू : मग आता करायचं काय?

गिरिधर : तिला कुष्ठधामात ठेवायला हवं. किंवा एखाद्या लेप्रसी हॉस्पिटलमधे.

बापू : नाही – मी नाही पाठवणार तिला हॉस्पिटलमधे. मुळीच नाही पाठवणार. मधे चेकिंगला नेलं होतं, तेव्हा तिथली एक विद्रूप म्हातारी पाहून धसका घेतलाय बेटीनं. तिथले संचालक खूप आग्रह करीत होते ठेवायचा. पण मी म्हटलं, नाही म्हंजे नाही!

(नंदा येऊन खोलीत धूप घालू लागते.)

गिरिधर : बापूसाहेब, कुष्ठधामात सगळे रोगी काही त्या बाईसारखे विद्रूप नसतात.

आणि विद्रूप माणसंही रोगातून बरी झालेली असू शकतात. माझं ऐका बापूसाहेब – अजून वेळ गेलेली नाही. अजून रोहिणीला कुष्ठधामात ठेवा.

बापू : तुम्ही काहीही म्हणा, मी नाही तिला माझ्यापासून दूर ठेवणार!

गिरिधर : बोलतो म्हणून माफ करा, बापू, पण बेटी बरी झाली तरच ती आपली! नाही तर तिची माडीवरची खोलीसुद्धा कुष्ठधामापेक्षा वाईट! तिला नुसतं आपल्यात ठेवलं म्हणजे का ती आपल्यासारखी होणार आहे?

मोहन : बापू, मी बोलू? रागावणार नसलात तर सांगतो. आता दिदीला घरात ठेवणं धोक्याचं आहे. खरं सांगू? दिदी इथेच राहावी असं तुमच्यासारखंच मलाही वाटतं. पण आपली भावना लोकांना समजणार नाही. यांच्या घरात रोग आहे असा नुसता संशय आला, तरी लोक आपल्याला वाळीत टाकतील. आपल्या दुकानावर येणं बंद करतील.

बापू : (संतापून) – बघा, बघा, गिरिधरजी, पोरगं कसं बोलतंय ते बघा! कालपर्यंत लेंग्याची नाडी बांधायला शिकवावं लागत होतं. पण व्यवहाराच्या सोयीसाठी याला धंद्यात भागीदार केला – आणि लगेच लागला मला शिकवायला दुकान कसं चालवायचं ते!

मोहन : बापू – आजवर आम्ही कुणी तरी कधी तुम्हाला विरोध केलाय का? पण आता धंद्यावर बेतायची पाळी आली, म्हणून —

बापू : अरे जळू दे धंदा! माझ्या पोटच्या पोरीपेक्षा का धंद्याचं महत्त्व जास्त आहे?

मोहन : तुम्हाला महत्त्व नसेल बापू, पण दुकान बंद झालं तर सबंध घराचेच हाल होतील ना? आपले सर्वांचे आणि दिदीचेही....

बापू : होऊ देत. पण प्राण गेला तरी बेटी कुष्ठधामात राहाणार नाही. ती हे घर सोडील ते फक्त सासरी जाण्यासाठी!

गिरिधर : अशी डोक्यात राख घालून घेऊ नका बापू. शांतपणे विचार करा. तुम्हाला रोहिणीला हॉस्पिटलमधे एकटं ठेवायची कल्पना सहन होत नाहीय् – होय ना!

बापू : नाही जावईबापू, तेवढंच नाही. तुमचं–मोहनचं बोलणं मला समजत नाही असं थोडंच आहे? पण आजच्या घडीला मुलीला कुष्ठधामात पाठवणं म्हणजे स्मशानात पोचवणं आहे! तिथनं ती कधीच परत येणार नाही! आली तरी कुणी तिला जवळ उभं करणार नाही. एकदा तिच्यावर कुष्ठरोगाचा शिक्का बसला की, ती माणसातून उठली! आपल्याला कायमची अंतरली!

गिरिधर : पण असं म्हणून किती दिवस चालेल? रोहिणीचा आजार आता अशा अवस्थेला पोचलाय की, एक दिवस तिची संवेदनाच नाहीशी होईल.

वापू : म्हणजे ?

गिरिधर : म्हणजे तिला कापलेलं, भाजलेलंसुद्धा समजणार नाही. मग या घरात कसं सांभाळणार तुम्ही तिला ?

वापू : नाही, नाही — असा भयंकर प्रसंग यायचाच नाही. त्याआधीच ती बरी होईल. आपण औषध देतोच आहोत तिला ! ( गिरिधर काहीच बोलत नाहीत. ) तशी ती बधीर झाली – तर – तर पाठवावंच लागेल तिला कुष्ठधामात. पण असं कसं होईल ? माझा महालक्ष्मीवर भरंवसा आहे ! ती तिला सांभाळील ! — माझी खात्री आहे ! ती वेळ यायची नाही ! मी सांगतो – कधीच यायची नाही. ( जातात. )

( मग जशी काही हे सगळं ऐकण्याचा प्रयत्न करीत असलेली नंदा पुढे येते. )

नंदा : काय म्हणाले बापू ? दिदीला कुष्ठधामात पाठवायला तयार नाहीत ना ते ?

मोहन : हो – त्यांना वाटतं, ती इथेच बरी होईल.

नंदा : होईल ना – खात्रीनं बरी होईल ! पण तोपर्यंत आपण सगळे मात्र या रोगानं सडून गेलेले असू !

मोहन : ( आश्चर्यानं ) नंदा !

*नंदा : ( उसळून ) किती दिवस हे सहन करायचं मोहन !* बघताबघता चार वर्षं गेली – बापू दिदीच्या आजाराचंच कौतुक करताहेत – पण दुसऱ्याचा विचार कुणी करायचा ? बाकीच्यांसाठी स्थळं बघायला आहे कुणाला वेळ ?

गिरिधर : अगं नंदा, आम्ही बघतोच आहोत तुझ्या लग्नाचं.

नंदा : कशाला बघता ? घरात राबायला हक्काची मोलकरीण आहे ना ! दिदी आजारी आहे – तिला फुलात ठेवायची ! आम्ही मात्र कसलीच आशा ठेवायची नाही ! शिक्षणाची नाही – मौजमजेची नाही – लग्नाची नाही – की संसाराची नाही ! फक्त एकसारखं काम उपसायचं ! — काम ! कसलीही तक्रार न करता ! आणि सारखं भीत राहायचं ! आपल्याला रोग होणार नाही ना ? लोकांना कळणार नाही ना ? ही कुष्ठरोगी मुलीची बहीण म्हणून – कुणी आपल्याकडे बोट दाखवणार नाही ना ? ( एकदम रडू फुटून ) नाही हो भावजी, हा रोग दिदीला नाही झालेला ! आमच्या सबंध घरालाच झालाय् !

( क्षणभर स्तब्धता. मग एकाएकी माडीवरून रोहिणीच्या किंकाळ्या ऐकू येतात. ती पलंगावर झोपलेली. झोपेतच घाबरून किंचाळते आहे. )

रोहिणी : बापू – मोहन – ती बघा कशी करतेय् – मला वाचवा बापू – !

गिरिधर : नंदा – जा – बापूंना बोलाव. ( ती जाते. )

( मोहन व गिरिधर धावतच माडीवर येतात. )

मोहन : दिदी – काय झालं दिदी ?

( नंदा बापूंना घेऊन माडीवर येते. )

बापू : काय झालं ? बेटी, बेटी – घाबरलीस का ?

रोहिणी : ( अर्धवट जागी ) ती – ती आली होती इथे.

बापू : ती कोण ?

रोहिणी : ती – ती, त्या दिवशी त्या तिथे भेटलेली बाई ! ( आठवणीनं शहारते. ) ती होती ना – कुष्ठरोगी म्हातारी — हातांपायांची बोटं गळालेली – नाक झडलेली – कुबडी – दात पडकी – ती हसत होती – खिः खिः करून – माझ्याभोवती झडके हात ओवाळून – मला बोलावत होती कुष्ठरोग्यांच्यात. बघा – अजून – अजून दिसतेय् मला !

बापू : चल – तुला स्वप्न पडलं – ती म्हातारी कशी येईल इथे ?

रोहिणी : ती, ती नव्हतीच. ती मी होते. मीच होते. कुष्ठधामातली मी !

बापू : चल, तुला कोण ठेवतंय् कुष्ठधामात ? उगाच घाबरू नकोस. झोप बरं स्वस्थ.

रोहिणी : तुम्ही इथेच बसा बापू, मला झोप लागेपर्यंत. मला भीती वाटते.

बापू : बसतो. तू झोप. ( बापू तिला थोपटू लागतात. ती हळूहळू झोपी जाते. मोहन, नंदा व गिरिधर, यांना ) मी बसतो तिच्याजवळ, थोडा वेळ. तुम्ही जा झोपायला. ( ती तिघे जाऊ लागतात. )

मोहन : ( अचानक थांबून ) भावजी ! – जरा थांबा ! हे बघा काय ! बाप रे....!

बापू : काय झालं मोहन ?

मोहन : तिकडे बघा — रक्त !

( बापू आणि गिरिधर पाहातात. रोहिणीचं पांघरूण रक्तानं भरलेलं आहे )

दिदी ऊठ, दिदी !

( तिचं पांघरूण बाजूला करतो. ती उठून बसते. )

रोहिणी : काय झालं मोहन ?

मोहन : ( ओरडून ) अगं तुझ्या पायातनं रक्त येतंय् !

गिरिधर : बाप रे, थारोळंच झालंय् ! बघू रोहिणी तुझा पाय ? अगं, तुला दुखत नाहीय् ?

रोहिणी : नाही ! काय झालं असेल हे ?

गिरिधर : मांस खाल्लं गेलंय् ! करंगळी न् बाजूचं बोट ! दोन्हीचा तळ कुरतडून खाल्लंय् उंदरानं !

मोहन : पण दिदी, एवढं होईस्तवर तू ओरडली कशी नाहीस ? ( फडताळातून कापूस नि चिंधी काढतो. )

रोहिणी : मला तर अजूनसुद्धा दुखत नाहीय् !

बापू : (एकदम डोकं धरून खाली बसतात.) बस्! – हाच शेवट! सर्वांनी ज्या धोक्याचा इशारा दिला होता, तोच हा! बेटीची संवेदना नष्ट होईल! तिला कापलं-कुरतडलेलंही कळणार नाही! मग या घरात तिला कुठवर सांभाळणार तुम्ही? तोच – ज्याला भीत होतो तोच क्षण अखेरीस येऊन ठेपला!

मोहन : काय झालं बापू?

बापू : (कापूस-चिंधी दाखवून) मोहन, आण ते इकडे.

मोहन : असू दे! मी बांधतो जखम!

बापू : नको बाळ! उद्या बेटी हॉस्पिटलमध्ये जाणार! तिची या घरातली शेवटची सेवा तरी मला करू दे!

रोहिणी : बापू! (त्यांना मिठी मारून रडू लागते.)

(पडदा)

(अंक पहिला पूर्ण)

# अंक दुसरा
## प्रवेश पहिला

(एक कुष्ठरोगाचं हॉस्पिटल. तिथले संचालक डॉक्टर वारंग यांचे केबिन. मध्यमवयीन, भारदस्त डॉक्टर वारंग टेबलपाशी बसलेले. त्यांच्या हातात एक रिपोर्ट. क्षणभराने बापूसाहेब आत येतात. त्यांच्यामागून रोहिणी. तिचा चेहरा पदराने बराचसा झाकलेला.)

डॉ. वारंग : बसा. आपण सराफ ना?

बापू : हो. ही माझी मुलगी – रोहिणी.

डॉ. वारंग : हिचे रिपोर्ट्स मी वाचले. मला वाटतं, हिला इथे ठेवणं भाग आहे. तेच तिच्या हिताचं आहे.

बापू : (घाईघाईनं) तसं कशाला? तुम्ही लिहून द्याल ती ट्रीटमेंट घरच्या घरीच –

डॉ. वारंग : घरच्या घरीच ट्रीटमेंट देऊन आता भागायचं नाही सराफसाहेब. आधीच फार उशीर झालाय्.

बापू : पण इथे ती एकटी कशी राहील?

डॉ. वारंग : तुम्ही असं करा. इथलं वातावरण तुम्हाला चांगलं वाटलं, घरच्यासारखं वाटलं, तर हिला इथे ठेवा. नाही तर घरी घेऊन जा. काय?

बापू : समजा, हिला इथे ठेवायचं ठरलं, तर हिची राहाण्याची वेगळी व्यवस्था होऊ शकेल का?

डॉ. वारंग : येस्. दॅट कॅन बी ॲरेंज्ड. (दाराशी जाऊन बाहेरच्या शिपायाला) जरा साहेबांना हॉस्पिटल दाखवून आण, आणि आपल्या स्पेशल रूम्सही दाखव. (बापूंना) जा त्याच्याबरोबर.

बापू : चल बेटी.

रोहिणी : नको. मी इथेच बसते – तुम्ही या जाऊन.

बापू : (आश्चर्यानं) म्हंजे? तुला नाही यायचं? (ती मानेनंच 'नाही' म्हणते.

बापू जातात. )

डॉ. वारंग : रोहिणी, तू का नाही गेलीस ?

रोहिणी : मी वेगळं काय ठरवणार, डॉक्टर ?

डॉ. वारंग : म्हणजे ?

रोहिणी : मी आता पक्का निश्चय केलाय्.

डॉ. वारंग : कसला ?

रोहिणी : तुम्ही पाहिलंत ना आता ? बापूंना पेच पडलाय् की, मला एकटं कसं सोडायचं ? मला रोग लागल्याचं कळलं, त्या दिवसापासूनच त्यांनी स्वतःला जसं काही माझ्या आजाराला वाहून घेतलंय् ! मला वचन दिलंय्, कधीच अंतर न देण्याचं. पण असं कुठवर चालणार ? कुणी कुणाच्या जन्माचा का पत्कर घेऊ शकतं ?

डॉ. वारंग : मग तू काय ठरवलंयस ?

रोहिणी : मी त्यांना या पेचातून सोडवणारय. त्यांच्या वचनातून मोकळं करणारय. आता त्यांनी माझ्यात गुंतून पडायला नकोय्. आधीच गेली चार वर्षे त्यांनी माझ्या आजाराचं ओझं निरपराध सहन केलंय्. आता तरी या छळातून त्यांची सुटका करायला नको का ?

डॉ. वारंग : समंजस आहेस तू. (क्षणभर स्तब्धता. मग – )

रोहिणी : डॉक्टर, ती अजून आहे का हो ?

डॉ. वारंग : कोण ?

रोहिणी : ती हो – मागे आम्ही इथे आलो होतो – तेव्हा दिसली होती ती म्हातारी ! बाई गं – काय विद्रूप होती ! मला तर ती एकसारखी डोळ्यापुढे दिसायची ! कुबडी – भुतासारखी दिसायची बघा !

डॉ. वारंग : दिसली असेल एखादी विद्रूप म्हातारी ! – पण तेवढ्यानं घाबरून जायचं कारण नाही.

(बापू आत येतात. विलक्षण उद्विग्न.)

हे काय – एवढ्यात परत आलात ?

बापू : (भडकून) मला पाहायचं नाही. जेवढं दिसलं त्यावरून कल्पना आली. चल बेटी – मी नाही ठेवणार तुला इथे.

रोहिणी : नाही बापू – मी इथेच राहायचं ठरवलंय्.

बापू : बेटी – तुला वेड लागलंय् की काय ?

रोहिणी : मी नीट विचार करूनच सांगतेय्, बापू.

बापू : बेटी ! (एकदम तोंड फिरवतात. गदगदून) बेटी, तू हे स्वतःसाठी सांगत नाहीस. माझ्यासाठी सांगतेयस.

रोहिणी : (स्वर शक्य तेवढा आनंदी ठेवीत) मला ही जागा आवडलीय् बापू! किती शांत आहे! स्वच्छ आहे!

डॉ. वारंग : मी ऑफिसमध्ये तुमचा केस पेपर तयार करतो. तुम्ही या तिकडे. (रोहिणीला) तुम्ही थांबा इकडेच. मी पाठवतो कुणाला तरी खोली दाखवायला. (जातात.)

बापू : अजून विचार कर बेटी. इथल्यापेक्षा घरी अधिक बरं नाही का? तू एकटी कशी राहाशील बेटी? एकटी कशी राहाशील?

रोहिणी : बापू, घरी तरी काय, मी माणसात थोडीच मिसळते? एकटीच माडीवरच्या खोलीत बसते ना? जेवण तिथे, वेणीफणी तिथे, आणि झोपही तिथेच! बाहेरच्या जगाचा वारा नाही! मग त्यापेक्षा इथे बरं की! निदान घर बाटवतोय् असं तरी वाटायला नको! (बापू काहीच बोलत नाहीत.) बापू – तुम्हाला नंदा आहे, मोहन आहे. इतके दिवस सगळं लक्ष माझ्याकडे दिलंत. आता मला विसरून जा, आणि त्यांचं करा. नंदीचं लग्न करा, म्हणजे तिचा माझ्यावरचा राग जाईल. लग्न ठरलं म्हणजे ते पहिल्यांदा मला कळवायचं बरं का! मला खूप आनंद होईल! नंदीला म्हणावं, घाबरू नकोस, मी येणार नाही लग्नाला! पण पत्रिका मात्र पाठवच!

बापू : किती बडबड करतेस? खरंच का इथे राहावं लागणार, याचं तुला दुःख होत नाहीय?

रोहिणी : खरंच नाही बापू. उलट मोकळं मोकळं वाटतंय्. कुणाची कुजकट बोलणी ऐकून घ्यायला नकोत, की कुणाला काही समजेल याची भीती नको. मी आता या जागेलाच माझं घर मानणारय्!

बापू : हां – हां बेटी – असली भयंकर थट्टा करू नकोस. हे तुझं घर होणार नाही! कधीच नाही!

रोहिणी : तुम्ही या बापू आता. माझा विचार डोक्यातनं काढूनच टाका. आणि थोडी विश्रांती घ्या. किती थकलाय् तुम्ही! थोडे दिवस आराम करा. मोहन बघेल दुकानाकडे.

बापू : बेटी –

रोहिणी : (हलकेच) जा बापू. डॉक्टर तुमची वाट पाहात असतील ऑफिसमध्ये.

बापू : जाऊ?

रोहिणी : जा – माझी काही काळजी करू नका. इकडे आहेत माझ्याकडे बघणारी माणसं.

बापू : मी येत जाईन अधूनमधून. तुला काही हवं–नको कळवत जा.

रोहिणी : हो.

बापू : ( रोहिणीचा हात गालाशी दाबून धरीत ) येतो बेटी.
रोहिणी : ( हसून ) सांभाळून जा हं. ( बापू जातात. ती त्यांना हसतमुखानं दारापर्यंत पोचवते. .परत येते, आणि एकाएकी खाली कोसळून अनावर आक्रोश करू लागते. ) बापू ! – बापू ! मला एकटीला इथे राहायचं नाही ! मी अन्नपाणी घेणार नाही ! औषध घेणार नाही ! तश्शी मरून जाईन ! पण बापू, तुमच्याशिवाय मला एकटीला राहायचं नाही ! मला मरायचंय् बापू – ! मला मरायचंय !

( काळोख )

( प्रवेश पहिला समाप्त )

## प्रवेश दुसरा

( रोहिणीची स्पेशल रूम. हवेशीर आणि स्वच्छ. एका बाजूला मोरी, टेबल, खुर्ची, एक फडताळ आणि पलंग. त्यावर स्वच्छ पांढरी चादर, आणि पांढरा अभ्रा चढवलेली उशी.
रोहिणी पलंगावर रडत पडलेली. या चार दिवसात ती नुसतीच रडत राहिली असावी, असा तिचा एकंदर अवतार. पिसाळल्यासारखं वागणं. दार ढकलून, एक काळीसावळी पण तरतरीत तरुणी आत येते. ही गुणी. तिच्या हातात जेवणाचं ताट. )

गुणी : बाई – ( रोहिणी काहीच बोलत नाही. बडबडी गुणी पुढेही एकटीच बोलत राहाते. पण रोहिणी तिकडे लक्षसुद्धा देत नाही. ) बाई – जेवण आणलंय्. जेवून घ्या की बाई. ( थांबून ) अहो, जेवणानं काय पाप केलंय् ? ( थांबून ) हे बघा, मी जेवण हितं ठेवतेय. तुम्हाला जेवायचं आसलं तर जेवा, न्हाई तर मी चालले. न्हाई तर काय ! ल्हान प्वाराला भरवतात तशी मी तुमास्नी भरवीत बसू ? हे बगा. मी गेलो हां ऽ. ( दारापर्यंत जाते. क्षणभर थांबते. मग परत फिरते. ) अवं आता जेवा की श्येन्यासारकं. लईच डोकशात राख घालून घेतली म्हनं ? च्यार दिस झालं हितं आल्याला – तवापासनं चार घास तरी गेलं का प्वाटात ? एकसारकं रडं, रडं, रडं – अशानं काय मरून जायाचं हाय का, रडून रडून ?
रोहिणी : ( संतप्त स्वरात ) हो. मरून जायचंय. तू आता चालती होतेस की नाही ?

गुणी : का म्हून ? तुमी कोन वं सांगनार मला जा म्हून ? मी हितं अश्शी वसून न्हाईन. हां ऽ गुणी म्हंत्यात मला सातारची. मी कुनाचा एक सबूद न्हाई आयकून घ्येनार. गेलं चार दीस आली असल, ती कमळी, न्हाई तर गोदी. तिला दावा तुमचा राग. आजपास्नं माजी डूटी हाय. (काही क्षण थांबून) बाई, मी एक इचारतो – तुमचा वा तुमास्नी हितं ठेवून गेला. लई दुक जालं तुमास्नी. समदं खरं. पर दुक काय जगात एकट्या तुमास्नीच हाय व्हय ? समद्यास्नीच दुख हाये वो. ह्ये न्हाई तर त्ये. आता माजंच बगा ना – आयेनं करज काढून लगीन करून दिलं माजं – असला कवतिकाचा धनी भेटला मला – समदं गूळपीट नीट जमलं, सोन्यासारका संसार जाला सा म्हईनं, आन् एकदम पाठीवर चट्टा उठला कुठनं त्यो ! – येक डाव न्हात व्हतो, तर धनी एकदम घुसलं खोपीत – लई पांचट सोभाव बगा धन्यांचा – आन् म्हनतं कसं – गुन्ये, अगं तुज्या पाठीवर एवढं मोठं ल्हासं, न् इक्तं दीस माला दिसलं कसं न्हाई ? म्या म्हनलं, तुमी कंदी उजेडाची माजी पाठ पाह्यली ? कायबाय बोललं, पर डागदराकडं घेऊन गेलं दोन दिसांनी. तिथं कळलं का, ह्यो रोगोबा नागोबा अंगात शिरलाय ! धनी म्हनलं, लगी इस्पितळात ठेवायचं म्हंजी चट बरी व्हशील – घाबरू नगं. अशीच मी रड रड रडली तुमच्यावानी – तर धनी म्हनलं, रडतीस कशापायी ? दवा घे, न् लौकर बरी हो. त्येंच्या मायेनं मी दुख गिळलं न् हितं न्हायलो. हितली मानसं चांगली, मला दवा दिला न् कामबी दिलं – भांडी घासायची, पेशल रूममधी ज्येवन द्याचं, केर काढायचं, मुलांना खेळवायचं – म्हंजी बाई आमी घरी करतो ना, समदं तसंच. हां – आता (लाजून) घरात प्वार नव्हतं खेळवाया, पर मी बरी होऊन घरी गेली ना, की त्येबी – (अधिकच लाजते.) या बया, मी एकलीच बडबड बडबड करती आन् तुमी एक शबुद तोंडातनं काडाया म्हाग जालं – मंग उपेग काय त्या तोंडाचा ? (जेवण पुढे करीत) हे घ्या – म्हंजी खान्यासाठी तरी त्वांड कामाला यील !

रोहिणी : नको म्हटलं ना ? ताट परत घेऊन जा – (दारावर टकटक – ओरडून) येऊ नका – (पुन्हा दार वाजतं.) येऊ नका म्हटलं ना ? (दार वाजतं.) मी औषध घेणार नाही !

बाहेरून आवाज : मी औषध घेऊन नाही आलो.

रोहिणी : मला काहीच नको. तुम्ही परत जा.

(दार ढकलून धनंजय आत येतो – गुणी उठून उभी राहाते.)

धनंजय : आत येऊ ?

रोहिणी : नको म्हटलं ना ?

गुणी : बसा. ह्यो बगा – ह्यो असा अवतार करून ठिवलाय्. कोंडून घातलेल्या मांजरीवाणी. कवाधरून विनवणी करतोय्, जेवून घ्या – जेवून घ्या – पर ह्या

तोंड एकदम मिटल्यालं, तंबाकूची गुळणी धरल्यागत !

धनंजय : पुरे गं तुझी बडबड ! ताट आणलंस ना ? आता जा तू.

गुणी : मी जातो साहेब – पर तुमी, कसं बी करून, यास्नी चार घास खाया लावा – अवं गेलं चार दीस उपाशीच बसलंय् म्हणा की ! आता रोग जाला तर जाला – आपुन मागल्या जल्मी काय तरी पाप केलं आसल म्हनावं !

धनंजय : काही नाही पाप नि बीप. सगळा अडाणीपणा. रोगासारखा रोग. औषध घेतलं की बरा होतो. समजलं ? आणि आता जा बरं तू –

गुणी : जातो. ( जाते. )

धनंजय : ( रोहिणीला ) रागावलात माझ्यावर ? मी जाणारच आहे पाच मिनिटात.

रोहिणी : कुणी पाठवलं तुम्हाला ? डॉक्टर वारंगांनी ?

धनंजय : नाही. मला कुणी पाठवलं नाही. मी आपणहून आलो. ( खुर्ची ओढून बसतो. )

रोहिणी : ( नकळत पदरानं तोंड पुसत ) कशाला आलात ?

धनंजय : सहज. माझं नाव धनंजय. धनंजय मोडक. मी नुकताच आलो इथे. अजून कुणाच्या फारशा ओळखी नाहीत. कंटाळा येतो एकट्याला, म्हणून आलो.

रोहिणी : तुम्हाला कधीपासून आहे हा रोग ?

धनंजय : मला ? मला रोग नाही....

रोहिणी : ( एकदम संतापून ) मग चालते व्हा इथून. तुमच्यासारख्यांना काय कळणार आमची अवस्था ! नुसती गंमतच बघणार की नाही तुम्ही ! तीही लांबून ! आम्हाला स्पर्श करण्याचीसुद्धा तयारी नसते तुमची ! ( हात पुढे करून ) बोला – आहे हिंमत ? आहे हिंमत मला स्पर्श करण्याची ?

धनंजय : ( तिचे हात दोन्ही हातात गच्च पकडून ) एका तरुण मुलीला स्पर्श करण्याचा संकोच वाटतो, एवढंच, नाही तर, एरवी कसली भीती ? – मला खूप माहिती आहे या आजाराची.

रोहिणी : ( हात सोडवून घेत ) काय माहिती आहे ?

धनंजय : सांगू ? या आजाराला रडणं एकदम वर्ज्य ! जोवर मनाला उभारी नाही, तोवर औषधाचाही उपयोग नाही. दुःखामुळे रिॲक्शन्स अधिक जोराच्या येतात. आणि तुम्ही तर इथे आल्यापासून गेले चार दिवस एकसारख्या रडताय्. धड जेवत नाही, औषध घेत नाही. काय विचार काय आहे तुमचा ?

रोहिणी : मला वाटलंच. तुम्हाला डॉक्टर वारंगांनी पाठवलंय. मी औषधच घ्यायला हवंय ना ? आणा इकडे. घेऊन टाकते. म्हणजे तुमचं समाधान होईल !

धनंजय : हे घ्या तुमचं औषध. ( पिशवीतून एक पुस्तक काढून देतो. )

रोहिणी : ( आश्चर्यानं ) पुस्तक ?

धनंजय : कादंबरी आहे. तुम्हाला वाचनाची खूप आवड आहे असं ऐकलंय मी.
रोहिणी : होती – एके काळी. पण गेल्या किती तरी महिन्यात, एकसुद्धा पुस्तक वाचलेलं नाही मी. माझ्या आजाराचेच विचार –
धनंजय : अं हं! ते या क्षणापासून सोडून द्यायचे. आजाराची काळजी घ्यायला इथे डॉक्टर्स आहेत. आपण कशाला काळजी करायची?
रोहिणी : मग? आपण काय करायचं?
धनंजय : का? तुम्ही मराठीच्या ग्रॅज्युएट आहात. पुस्तकं वाचा, काही लिहा.
रोहिणी : (किंचित् गंमत वाटून) लिहिण्यावाचण्याची औषधं सांगता? म्हंजे तुम्ही आहात कोण? मास्तर?
धनंजय : (हसून) मास्तर? पूर्वी होतो. पण आता सोशल वर्कर आहे. थोडाफार अभ्यास केलाय् मी या रोगाचा. त्याच तळमळीनं इकडे आलोय्.
रोहिणी : कुष्ठरोग्यांविषयी कसली तळमळ? त्यांची तर लोकांना घाण वाटते....
धनंजय : म्हणूनच ज्या एखाद्याला घाण वाटत नाही, त्यानं इथे यायला हवं....
रोहिणी : आलात कुठून तुम्ही?
धनंजय : उस्मानाबादहून. तिथल्या सरकारी शाळेत शिकवत असे.
रोहिणी : मग? ती नोकरी सोडली?
धनंजय : हो.
रोहिणी : मग भागतं कसं तुमचं?
धनंजय : इथे मिळेल त्या तुटपुंज्या स्टायपेंडवरच भागवायचं. पैशाचा विचार कधी केलाच नाहीय मी.
रोहिणी : न करून कसं चालेल?
धनंजय : न चालायला काय झालं? माझ्या गरजा मी कमीच केल्याय्त. लग्न करणार नाही असं घरी कळवलंय्. तेव्हा जबाबदारीही फारशी नाही.
रोहिणी : तुम्ही निरोगी आहात म्हणून सांगते. काळजी घ्या स्वतःची —
धनंजय : (हसून) घाबरू नका. आल्यापासून रोज दहा मिलिग्रॅम डॅपसन् घेतोय्! मला कसलाही संसर्ग होणार नाही. उघड्या हातांनी जखमा बांधायलासुद्धा काही वाटत नाही मला.
रोहिणी : सांभाळा स्वतःला. उगाच धाडस कशाला करता?
धनंजय : होऊन होऊन काय होईल? रोग लागेल – तसं झालं, तर स्वतःवर प्रयोग करून घ्यायची आयतीच संधी मिळेल —
रोहिणी : पुरे! काही तरी बोलू नका!
धनंजय : (मोठ्यानं हसून) तुम्हाला वाटत असेल, हा माणूस स्वतःला काय हीरो-बीरो समजतो की काय? – पण तसं काही नाही हो! मीसुद्धा इतरांसारखाच

मित्रा आहे! गंमत सांगतो – सुरुवातीला मारे उदात्त आदर्श डोक्यात घेऊन आलो. पण पहिले चार दिवस असे कठीण गेले! डॉक्टर सक्सेनांबरोबर इथल्या वॉर्ड्समधून फिरलो, तेव्हा पोटात अक्षरशः ढवळून आलं! पहिल्यापहिल्यांदा जेवणसुद्धा जात नसे. पाणीदेखील प्यायचं म्हटलं, तर ते कुठल्या रोग्यानं भरलं असेल असं मनात यायचं. पण नंतर सवय झाली. वाटायला लागलं की, यात घाबरण्याजोगं, किळस येण्याजोगं, काही नाही.... इतर हॉस्पिटल्ससारखंच हे एक हॉस्पिटल! इतर रोगांसारखाच हाही एक रोग.... इतर जखमांसारख्याच याही जखमा....

रोहिणी : खरंच – असं वाटतं तुम्हाला!

धनंजय : हो – पण त्या जखमा आपण बऱ्या करू शकत नाही याची फार खंत वाटते....असाहाय्य वाटतं....एक तरी कुष्ठरोगी बरा करून आपण परत माणसात आणायला हवा असं वाटतं.... तुम्ही मला मदत कराल या कामात?

रोहिणी : मदत? कशासाठी?

धनंजय : एका कुष्ठरोग्याला पुन्हा पहिल्यासारखं करण्यासाठी!

रोहिणी : कुणाला? मला?

धनंजय : हो. आपण शिकस्तीचा प्रयत्न करून तुम्हाला बरं करू.

रोहिणी : तुम्ही एवढं बोललात.... हेच खूप आहे....

धनंजय : असं का म्हणता?

रोहिणी : सुरुवातीला मलाही आशा वाटायची – पण आता चार-साडेचार वर्षं उलटून गेलीत. रोग बरा होण्याऐवजी वाढतच गेलाय्.

धनंजय : मग काय झालं?

रोहिणी : आता मी बरी होईन म्हटलं, तर लोक खुळ्यात काढतील.

धनंजय : काढू देत. माझी खात्री आहे, तुम्ही बऱ्या व्हालच.

रोहिणी : सांगू? तुम्ही हसणार नाही? आतून – अगदी आतून कुठून तरी मलाही वाटत आलंय् की, मी बरी होईनच! ही – ही नुसती आशा नाही – ही खात्री आहे! इंटर झाल्यानंतर गावातच मी एका मुलींच्या शाळेत नोकरी पत्करली होती. तात्पुरती. खूप मजा वाटायची शिकवायला. मुलींनाही माझा लोभ लागला होता. पण रिॲक्शन्स आल्या की घरी बसावं लागायचं. चार महिन्यात असे किती तरी खाडे झाले. मग सोडली नोकरी. मुली खूप हळहळल्या. चारच महिन्यांची नोकरी – पण तेवढ्या दिवसात मला परत माणसात आल्यासारखं वाटलं होतं – आपण कधी ना कधी तरी बरे होऊच, अशी खात्री वाटली होती!

धनंजय : मग – हे एवढं समजत असताना, खायचं–प्यायचं नाही, औषध घ्यायचं नाही, हा सत्याग्रह कशासाठी?

रोहिणी : नाही हो – मला आता जगायचंच नाही. फार एकटं वाटतं इथे – वाटतं, हा भयंकर एकटेपणा सहन करण्यापेक्षा मेलेलं काय वाईट ?

धनंजय : लक्षात घ्या – आता तुम्ही एकट्या नाहीत. आपण दोघांनी एक बेत ठरवलाय्. त्यात मला यश मिळायचं, तर तुम्ही बरं व्हायला हवं. ( ती बोलण्याचा प्रयत्न करते. ) ऐकून घ्या मी काय सांगतो ते. तुम्हाला माहीत नाही, पण आपल्या या हॉस्पिटलला जोडून एक छोटीशी शाळा आहे....

रोहिणी : शाळा ?

धनंजय : चाळीस-पन्नास मुलं आहेत. इथल्याच केसीस. ( ती आश्चर्यचकित ) हो. इतक्या लहान वयात त्यांना रोग झालाय, तरी आपल्या परीनं ती आनंदी आहेत. तुम्ही त्यांना शिकवायला जायचं. पुन्हा एकदा. पूर्वीच्याच उत्साहानं. मी बोलून ठेवतो डॉ. वारंगांकडे. आणि उद्या सकाळी तुम्हाला शाळेत न्यायला येतो. मधली सगळी सगळी निराशा आता विसरून जायची आणि पूर्वीसारखं जिद्दीनं शिकवायला लागायचं. त्या मुलांना आनंदी ठेवण्यासाठी – तुम्ही स्वतः आनंदात राहायचं....

( रोहिणी त्याच्याकडे बघत राहाते. तिला एका नव्या आशेचा स्पर्श झाला आहे. )

( प्रकाशझोतात गिरिधर. )

गिरिधर : रोहिणीला एका नव्या आशेचा स्पर्श झाला.... दुसऱ्या दिवसापासून ती हॉस्पिटलच्या शाळेत जायला लागली. मुलांना शिकवायला लागली. आजारावरून तिचं मन थोडं थोडं बाजूला व्हायला लागलं. त्याचा परिणाम अर्थात तिच्या तब्येतीवरही दिसायला लागला....

( काळोख )

( प्रवेश दुसरा समाप्त )

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १९८५८ नों. दि ...............
वि. नाटक क्र. १६९६३

## प्रवेश तिसरा

( रोहिणीची खोली. रिकामी. कुणी तरी दारावर थापा मारीत आहे. मग दार ढकलून डॉक्टर वारंग आणि धनंजय येतात. त्यांच्या हातात फुलं. )

धनंजय : अरे – आपण उगाचच दार वाजवत राहिलो. हिचा तर पत्ताच नाहीय !

डॉ. वारंग : शाळेतून आली नसेल. थांबू या इथेच.

धनंजय : डॉक्टर, प्रगती कशी काय आहे या पेशंटची ?

डॉ. वारंग : जेमतेम चार महिनेच ती इथे आहे. एवढ्यात कसं सांगणार ? पण जरा बरी दिसते. शिकवण्यात मन गुंतलंय हे चांगलंच आहे. कारण हा आजार जितका शरीराचा आहे, तेवढाच मनाचा आहे. कुष्ठरोगी साऱ्या जगापासून तुटून जातो. एकटा पडतो. स्वतःच्याच आजारामध्ये गुंगून जातो. त्यामुळे त्याचा आजार उलटा अधिक वाढतो.

धनंजय : तिथेच तर आमच्यासारख्या समाजसेवकांचा उपयोग !

डॉ. वारंग : पण फार थोडे लोक या बाजूला वळतात. घृणाच वाटते त्यांना या रोगाची. तुम्ही कसे काय आलात ?

धनंजय : पूर्वी मलाही घृणा वाटायची. करजखेड्याला मी शिक्षक होतो ना, तेव्हा. करजखेडा महारोगी गाव म्हणून आख्ख्या जिल्ह्यात प्रसिद्ध. लोक गावात यायला घाबरायचे. मीही तिथनं बदलीसाठी अर्ज केला होता. ऑथॉरिटीज्ना विचारलं होतं – या महारोग्यात मला पाठवलंय्, मी काय माणूस नाही का ?

डॉ. वारंग : मग ?

धनंजय : त्याच वेळी मला एक विलक्षण अनुभव आला.... आमच्या घराच्या समोरच्या कट्ट्यावर नरसूअण्णा म्हणून एकजण बसायचा – पन्नाशीचा कुष्ठरोगी. त्याची बायकामुलं त्याच्या वाऱ्याला उभी राहात नसत. दिवसातनं दोन वेळा त्याच्या थाळीत भाकरी फेकायची. तीही लांबून. तर त्या नरसूअण्णानं एकदा मला पाहिलं, आणि आपले बोटं झडलेले हात वर करून नमस्कार केला. मला आश्चर्य वाटलं. का केला त्यानं मला नमस्कार ? माझा–त्याचा काय संबंध होता ? पण नाही – माणसांनी त्याला दूर लोटलं, तरी त्याला माणसं हवी होती.... त्याचे डोळे विचारत होते – का हो ? का मला सगळ्यांनी एकटं सोडलंय् ? मी काय माणूस नाही का ? ( थांबून ) म्हणजे मी बदलीसाठी अधिकाऱ्यांना विचारत होतो – नेमका तोच प्रश्न तो मला विचारत होता ! कुष्ठरोग्यांना घाबरणारा माणूस

असतो ! आणि कुष्ठरोगी – तो माणूस नसतो का ? हे लक्षात आलं, आणि मी बदलीचा अर्ज फाडून टाकला !.... दुसऱ्या दिवशी माझे जुने कपडे, साबण आणि पाणी घेऊन गेलो.... नरसूअण्णाला म्हटलं, केवढी घाण येतेय् अंगाला ! हा साबण घे आणि चांगली खसखसून आंघोळ कर. स्वच्छ कपडे घाल. त्यानं इतक्या आनंदानं आंघोळ केली ! म्हणाला, उपकार झाले ! आमच्यासाठी एवढं कोण करतं ? त्याच्या त्या शब्दांनी, खरंच सांगतो, मी शरमलो. खरं म्हणजे मी एवढं काय केलं होतं त्याच्यासाठी ? आंघोळ तर आपण गुरांढोरांनाही घालतो ! पण तो माणसासारखा माणूस मात्र एवढ्या लहानशा सुखालासुद्धा पारखा झाला होता !

डॉ. वारंग : हाउ सॅड !

धनंजय : दोन दिवसांनी नरसूअण्णा शेतावरच्या खोपटात राहायला गेला.... आणि आणखी चार दिवसांनी तिथेच मेला ! त्याला करायला लावलेली एक आंघोळ – एवढीच माझ्या नशीबातली त्याची सेवा. त्या वेळी त्याच्या नजरेत दिसलेली कृतज्ञता हीच माझी कमाई. पण ती नजर मी अजून विसरू शकत नाही. त्या नजरेपायीच मी ठरवलं की, या माणसांसाठी जेवढं करता येईल तेवढं करायचं. म्हणूनच मी शाळेतली नोकरी सोडून इथे आलो. आता प्रत्येक कुष्ठरोग्यामध्ये मला नरसूअण्णा दिसतो, डॉक्टर. त्याचं राहून गेलेलं कामच मी करीत असतो. (अचानक दार उघडते आणि रोहिणी येते. तिच्या अंगावर फुलांफुलांची आकर्षक साडी. वृत्ती आनंदी. त्या दोघांना आपल्या खोलीत पाहून मात्र ती गोंधळते.)

रोहिणी : तुम्ही ?

दोघेही : हॅपी बर्थ डे ! (तिला फुले देतात.)

रोहिणी : माझा वाढदिवस – तुम्हाला कसा माहीत ?

डॉ. वारंग : का ? आमच्या रेकॉर्डला आहे की तुझी जन्मतारीख !

धनंजय : आम्ही कधीची वाट पाहात बसलोय् – इतका उशीर कसा झाला शाळेतून यायला ?

रोहिणी : शाळेत कार्यक्रम होणार आहेत ना प्रजासत्ताक दिनाला ! – त्यांची तालीम होती !

धनंजय : अरे वा ! तू कसला आयटेम करतेयस ?

रोहिणी : अं हं. ते आधी नाही सांगायचं. एकदम स्टेजवर दिसेल ! तुम्ही नक्की येणार आहात ना ? डॉक्टर, तुम्हीसुद्धा यायचं हं !

डॉ. वारंग : जरूर. पण आता मात्र मी जातो. राउंडची वेळ झाली. धनंजय, जॉइन मी लेटर ! (जातात)

धनंजय : शुअर. (खिशातून छोटे पार्सल काढून) हे घे. आवडतं का बघ.

रोहिणी : थँक यू. (उघडून पाहाते.) अय्या – सेंटची बाटली? (उघडून वास घेत) किती छान वास आहे याचा!

धनंजय : आवडलं ना?

रोहिणी : सेंट आवडलं! पण तुम्ही लक्षात ठेवून प्रेझेंट आणलंत हे त्याहीपेक्षा अधिक आवडलं! घरी बापू माझा वाढदिवस इतक्या थाटात करायचे! मिठाई काय, फुलं काय! (बोलताबोलता खोलीत फुले लावू लागते.) आज कुणीच काही दिलं नसतं ना, तर खूप वाईट वाटलं असतं मला!

धनंजय : छान दिसतात या खोलीत फुलं!

रोहिणी : अय्या – माझ्या लक्षातच आलं नाही! – चालेल ना हॉस्पिटलमध्ये फुलं लावलेली?

धनंजय : (हसून) चालेल म्हणजे? कुणाला चालेल? फुलांना चालेल असं मला वाटतं!

रोहिणी : (एकदम उदास होऊन) ती काय बापडी, एका दिवसात मान टाकणार!

धनंजय : अं हं. ते सोडून द्यायचं. आज ती किती छान फुलली आहेत, एवढंच बघायचं. वाचन कुठवर आलंय्? काल दिलेली कादंबरी वाचायला घेतली?

रोहिणी : संपलीसुद्धा! ही घ्या. (देते)

धनंजय : एवढ्यात वाचून झाली?

रोहिणी : शाळा सोडली, तर आणखी उद्योग काय असतो?

धनंजय : कशी वाटली कादंबरी?

रोहिणी : लेखक तर नावाजलेला आहे!

धनंजय : पण कादंबरी आवडलेली नाही – हो ना?

रोहिणी : तसं नाही. पण खूप उदास वाटतं हो अशी पुस्तकं वाचून!

धनंजय : का?

रोहिणी : सगळ्या पात्रांमध्ये विकृती. कोण वेडं, कोण नपुंसक, तर कोण बाहेरख्याली! – आणि शेवटी सगळ्यांचा नाश! एकजण वेडात मरतो, दुसरा आत्महत्या करतो, नायिका भ्रूणहत्या करते! खूप वाईट वाटतं वाचताना!

धनंजय : अगं, आयुष्य असतं तसं त्यात दाखवलंय्!

रोहिणी : ते समजलं हो मला. पण तुम्हीच सांगा – कादंबरीतली ती सगळी पात्रं हातांपायांनी धड! – निरोगी! त्यांनीसुद्धा दुःख करीत बसायचं म्हटलं, तर मग आमच्यासारख्यांनी कुठल्या आशेवर जगायचं हो?

धनंजय : सॉरी – उगाच दिली ती कादंबरी तुला!

रोहिणी : धनंजय, ज्यांचं आयुष्य सुखात जात असतं ना, त्यांना ही दुःखाची वर्णनं चांगली! गोडाच्या जेवणातल्या चटणी–लोणच्यांसारखी. पण जी माणसं वेदनां-

मध्येच होरपळताहेत, त्यांना – ( एकदम काही तरी आठवून ) खरंच, एक गोष्ट दाखवायची होती.

धनंजय : काय !

रोहिणी : ( बोलताबोलता एक कागदाचा जुडगा बाहेर काढून ) त्या दिवशी तुम्ही म्हणालात ना, काही तरी लिही म्हणून – म्हणून मी एक गोष्ट लिहून बघितली....

धनंजय : अरे वा – कशाबद्दल आहे ?

रोहिणी : निर्धार. कुष्ठरोगी मुलाविषयी आहे.

धनंजय : मग ती मला दाखवूच नकोस. दाखवलीस तर फाडून टाकीन.

रोहिणी : असं एकदम चिडायला काय झालं !

धनंजय : नाही तर काय ? गोष्ट लिहिलीस, तीसुद्धा कुष्टरोग्याची ! तुला काय वाटतं ? सबंध जगात कुष्टरोग हा एवढा एकच प्रॉब्लेम आहे ? फार स्तोम माजवतेयस तू स्वतःचं ! दुसरीकडे मन गुंतवायचं म्हणून लिहायचं – त्यातसुद्धा पुन्हा कुष्ठरोग कशाला हवा ?

रोहिणी : पुन्हा नाही लिहिणार ! ( कागद फाडून टाकते. )

धनंजय : अगं, अगं –

रोहिणी : तुमचं म्हणणं मला पटलं. पण दुसरं काय लिहिणार ? या भयंकर विळख्यातून मन बाहेर काढणं किती अवघड आहे, हे तुमच्यासारख्या निरोगी माणसांना कधी कळायचंच नाही.

धनंजय : उगाच वाटतं तुला. जरा आजूबाजूला बघ – किती तरी विषय आहेत! ( गुणी येते. तिने खोट्या मिश्या लावलेल्या )

गुणी : रोहिणीताय, रोहिणीताय – लौकर बोला –

रोहिणी : काय हवंय ? ( तिच्या अवताराकडे पाहून रोहिणीला हसू कोसळते. ) हे काय ? ( धनंजयला ) पाहिलंत ? ( दोघेही हसत सुटतात. )

गुणी : हसाया काय जालं ! बाप्ये लोक ह्या एवढ्याएवढ्या मिश्या ठेवतात, त्यांना न्हाई बरं कुनी हसत ? बायामानसानं मातूर एकबी मिशी लावायची न्हाई !

रोहिणी : नाही – लाव हो तू मिशी ! छान दिसतेय् तुला !

गुणी : दिसत्ये ना बेस ? डिरेशिंगवाल्यानं तुम्हाला दावून आनाया सांगितलंय. माला न् कमळीला या दोन मिश्या, आन् ही तुमची. पेशल जाड मिशी.

धनंज़य : ( रोहिणीला ) तू ? – तूपण आता मिश्या ठेवणार आहेस ?

रोहिणी : हो ! ( जाड कल्लेदार मिशी लावून दाखवते. ) कशी दिसते ? ( तिघेही हसत सुटतात. ) नाटकासाठी हो. कार्यक्रमात हिरकणी नाटिका आहे –

गुणी : हां. रोहिणीताय लई ब्येस आर्किटग करत्यात. ( करून दाखवीत ) हिरकन्ये,

तूस ठाव न्हाई ! गडाचं दरवाजं बराब्बर साडेआठच्या टायमाला बंद व्हत्यात –
रोहिणी : साडेआठच्या टायमाला नाही – सूर्य मावळल्यावर –
गुणी : त्येच त्ये. मावळल्यावर बंद व्हत्यात. तू कितीबी आढीबाजी केलीस –
रोहिणी : मनधरणी केलीस –
गुणी : तरी ते कालथ्यानंबी उघडनार न्हाईत.
धनंजय : कालथ्यानं उघडणार नाहीत ?
रोहिणी : कालत्रयी उघडणार नाहीत.
गुणी : त्येच हो ऽ तर असं आर्क्टिगवर आर्क्टिग, आर्क्टिगवर आर्क्टिग – मस्त आर्क्टिग करत्यात. पर रोहिणीताय, त्या हिरकणीचं काय खरं न्हाई बगा. तिच्या अंगात काय जोरच नाय ! मेलीचा चिमणीएवढा आवाज – घड घशातनं फुटतच नाय – त्यापरीस मला केली असतील हिरकणी, तर मी केवढं आर्क्टिग केलं असतं – ( करून दाखवीत ) किल्लेदार – मी हितंच अडकून पडीन हो ! मला घरी जायाचं हाये ! माजं तान्हं बाळ थितं माजी वाट पाहात असल हो ! माला घरी जाऊ द्या. माला माज्या मानसात परत जाऊ द्या. माला घरी –
( अचानक थांबते. क्षणभर शांतता. )
रोहिणी : सगळं सांगून टाकलंस. यांना सांगायचं नव्हतं आधी काहीसुद्धा. आता कशाला येणारायत ते नाटकाला ?
गुणी : नको येऊंदेत. नकाच येऊ वं तुमी –
रोहिणी : अगं – नका येऊ काय म्हणतेस ?
गुणी : तर ? आले, का समदे लोक काय म्हननार –
धनंजय : काय म्हणणार ?
गुणी : लोक म्हननार का, रोहिणीतायचं नाटक म्हून मोडकसाब आले उज्जू बगाया.
रोहिणी : काय तरी काय बोलतेस ?
गुणी : मी कुटं काय बोलत्ये ? लोक काय म्हनत्यात त्ये सांगितलं. आणखी काय म्हनत्यात म्हाईत हाये ?
धनंजय : काय म्हणतात ?
गुणी : म्हनत्यात, बगावं तवा साहेब सात नंबरच्या खोलीत !
रोहिणी : तू जा बघू रोहिणी. वीरकर मास्तरांना म्हणावं, चालतील या मिश्या. जा आधी. आणि आत्ता बोललीस ते आणखी कुठे बोलू नकोस.
गुणी : लोक बोलत्यात ते चालतं – आणि मी – ( पुटपुटत जाते. )
रोहिणी : ( अस्वस्थ ) काय तरी लोक असतात ! वाटेल ते बोलायला यांना – मला वाटतं, आपण भेटणं कमी करावं. कशाला उगाच – ?

धनंजय : ठीक आहे. मला काही लोकांच्या बोलण्याकडे लक्ष द्यावंसं वाटत नाही, पण तुला आवडत नसेल तर —

रोहिणी : असं नका ना म्हणू. मला आवडतं. तुम्ही इथे येता, बोलता, माझ्या आजाराचं काहीसुद्धा वाटून न घेता इथेच चहापाणी करता – म्हणून तर मला माणसात असल्यासारखं वाटतं. तुम्ही येईनासे झालात तर मला चैन पडायचं नाही.

धनंजय : मग ?

रोहिणी : तरीदेखील – लोकांना का हो वेडंवाकडं बोलू द्यावं ?

धनंजय : बरं – तुला मनस्ताप होईल असं काही मी करणार नाही. मग तर झालं ? तुला इथे येऊन भेटणारसुद्धा नाही. प्रार्थनेच्या वेळी आपली जी काही चुटपुटती भेट होईल, तेवढ्यावरच समाधान मानेन – बस्स् !

(तो जातो – त्याला थांबवावं असं रोहिणीच्या मनात येतं. पण तिच्या तोंडून शब्द उमटत नाही. ती नुसतीच, तो गेला, त्या दिशेकडे पाहात राहाते.... )

(काळोख)

(प्रवेश तिसरा समाप्त)

## प्रवेश चौथा

(डॉ. वारंगांचे केबिन. डॉ. वारंग आणि धनंजय.)

डॉ. वारंग : धनंजय – तुम्ही काय जादू केलीय् ?

धनंजय : कुणावर ?

डॉ. वारंग : रोहिणीवर. गेल्या आठवड्यात तिच्या रिॲक्शन्स चक्क कमी आल्या!

धनंजय : खरं म्हणता ?

डॉ. वारंग : तर ! तुम्हाला नाही तिच्यात सुधारणा दिसली ?

धनंजय : गेला आठवडाभर मी तिला भेटलोच नाही म्हटलं तरी चालेल !...

डॉ. वारंग : का ?

धनंजय : तिचं म्हणणं – आपण वरचेवर भेटलो तर लोक आपल्याविषयी नको ते संशय घेतील !

डॉ. वारंग : दॅट्स इट ! दॅट्स एक्झॅक्टली द थिंग ! लोक काय म्हणतील याची

काळजी ती करायला लागली ना! सर्वसामान्य निरोगी मुलीसारखी! म्हणूनच तिचं लक्ष आपल्या आजारापासून दूर झालंय्! त्यामुळेच रिॲक्शन्स कमी आल्या!

धनंजय : ग्रेट! आय थिंक, धिस ईज् ॲन अचीव्हमेंट!

डॉ. वारंग : इट सर्टनली ईज. हे पहिलं पाऊल आहे....सुधारणेच्या दिशेनं.

(रोहिणी येते. तिच्याबरोबर गुणी.)

गुणी : डाक्टर, तुमी सांगितलं ना रोहिणीतायना बोलवाया? हे बगा आलं.

रोहिणी : मला बोलावलंत?

डॉ. वारंग : चल जरा माझ्याबरोबर.

रोहिणी : कुठे?

डॉ. वारंग : चल तर खरी –! कुष्ठधाम बघायला पत्रकार आलेत. चांगल्या नामवंत पेपर्सची माणसं आहेत. तुझी ओळख करून द्यायचीय् त्यांच्याशी.

गुणी : हां हां. लई बडी बडी मंडळी हाईत. एकदम टिपटॉप. काय काय इच्यारतात बगा. न् समदं लिवून घेत्यात. मला इच्यारलं – हितं कसं वाटतं जिवाला? म्हनलं, ग्वाड वाटतं. तशी इच्यारलं, हितं कायम व्हाया कसं वाटल? म्हनलं, या बया! कायम कसं राहावं? माला का घर न्हाई? बरी जाली की मी जानारच हाये घरला. माजा मायेचा धनी हाय म्हनूलं. हां ऽ उगाच न्हाई! समदे गप गार जाले —

डॉ. वारंग : गुणे – वटवट पुरे! जा – त्यांना म्हणावं, मी आलोच. (गुणी 'लौकर या हां' म्हणत जाते.) रोहिणी, येतेस ना?

रोहिणी : नको. मी नाही येत.

डॉ. वारंग : चल, चल – तुझी माहिती द्यायला हवी पत्रकारांना. तुझ्यासारखी चांगल्या घरातली, ग्रॅज्युएट मुलगी इथे आहे, याचा या हॉस्पिटलला अभिमान वाटतो! जनतेलादेखील हे कळायला हवं की, कुष्ठरोग कुणालाही होऊ शकतो. नाही तर रस्त्यावरचे भिकारी पाहून गैरसमज करून घेतात ते.

रोहिणी : प्लीज डॉक्टर – मला नका बोलावू.

गुणी : (परत येऊन) अवं चला डॉक्टर – निगालं त्ये – असं कशापायी तिष्ठत ठेवता वं त्यांना पंढरपूरच्या रांगेतल्यागत?

डॉ. वारंग : आलो – आलोच! रोहिणी, चल ना लौकर! पत्रकार निघाले!

गुणी : अवं न्हाऊ दे तिला जड वाटत असलं तर! आम्ही जाऊ या – चला! मी थांबवते बरं त्येंना. आता लगी या. (लगबगीनं जाते.)

रोहिणी : तुम्ही जा डॉक्टर. मी नाही येत.

डॉ. वारंग : तुझी मर्जी! कधीकधी रोहिणी, आय रिअली डोंट अंडरस्टॅंड यू!

(जातात.)

धनंजय : आहे ब्बुवा ! – भाव आहे एका माणसाचा ! पत्रकारांशी मुद्दाम ओळख ! ( थांबून ) काय गं, गेली का नाहीस, ते एवढं बोलावत होते तर ?

रोहिणी : खरं सांगू ? मला नाही हो आवडत अशी ओळख करून दिलेली. डॉक्टर माझं गुणगान करतात, हॉस्पिटलचा मोठेपणा मिरवण्यासाठी. पण ते लोक मनातल्या मनात माझी कींव करतात ! म्हणतात, पाहा हो ! इतकी गुणी मुलगी ! पण बिचारी रोगानं वाया गेली ! मला नाही सहन होत कुणी माझी कींव केलेली !

धनंजय : साहजिक आहे !

रोहिणी : डॉक्टर तरी असं का करतात हो ? मला काय ते 'इथली शोभेची वस्तू समजतात ? तसं नसेल तर मग कशाला माझं असं प्रदर्शन मांडतात ? मला किसळवाणं वाटतं ते. आपल्या रोगाचं भांडवल करून, असं प्रदर्शनाला उभं राहायचं ! शी ! मी शो-पीस नाही ! माणूस आहे, माणूस !

धनंजय : शांत हो रोहिणी.

रोहिणी : कशी शांत होऊ ? तुम्ही सोशल वर्कर आहात ना ? तुम्ही तरी समजून घ्या. कुष्टरोग लागला, म्हंजे मी माणूस राहिले नाही का ? नुसती ही गाठींनी, व्रणांनी भरलेली कातडी, एवढीच का मी ? त्याशिवाय आणखी कुणीच नाही का ? या रोगी कातडीबद्दलच सगळ्यांनी घाण वाटून घ्यायची, तिरस्कार करायचा ! नाही तर कींव करायची – दया दाखवायची ! कातडी आज सुधारली – कातडी आज खराब झाली ! असं कातडी म्हणूनच जगायचं असेल, तर तेवढ्यासाठी स्वतःला जिवंत तरी कशाला ठेवायचं ? सांगा ना – सांगा – मला माणूस म्हणून पुन्हा कधी जगताच येणार नाही का ?

( काळोख )

( प्रकाशझोतात गिरिधरजी )

गिरिधर : रोहिणी चंदनपूरला आली, त्याला दीड वर्ष होऊन गेलं. या काळात तिची तब्येत तशी बरीच सुधारली, पण अजून पुरता गुण आला नव्हता. तिला प्रेडनिसोलन नावाचं औषध दिलं जायचं. ते घेतलं, की तात्पुरतं बरं वाटायचं, पण पुन्हा त्रास व्हायला लागला की त्यावरच अवलंबून राहावं लागायचं. सगळी ट्रीटमेंटच अशी दिली जात होती की, त्या औषधाशिवाय राहाणं अजिबात शक्य होत नव्हतं....

( काळोख )

( प्रवेश चौथा समाप्त )

## प्रवेश पाचवा

(सुमारे दीड वर्षानंतर. डॉक्टर वारंगांची केबिन. डॉ. वारंग टेबलाशी. गुणी येते. तिच्या हातात एक पिशवी. अंगावर त्यातल्या त्यात चांगले कपडे. नेहमीच उत्साही असलेली गुणी आज अधिकच आनंदात आहे....)

गुणी : मी चालली, डॉक्टर.

डॉ. वारंग : निघालीस ? सांभाळून जा. एकटीच जाणारायस ?

गुणी : व्हय. धन्यास्नी लई अजब वाटंल बगा. म्हनत्याल – अगं कशी गेली दोन वरसं, आन् तू एकदम बरी कशी जालीस ?

डॉ. वारंग : खरंच ! आणि हो, तुझे माझ्याकडे जमलेले पैसे घे. (सेफमधून काढून देत) दोनशे पस्तीस रुपये.

गुणी : एवढे ?

डॉ. वारंग : मग ? सांभाळून ने. (ती पैसे पिशवीत ठेवते.)

गुणी : पर डॉक्टर – मी खरंच शाप बरी झाली ना ?

डॉ. वारंग : हो – चट्टा दिसल्याबरोबर लगेच आलीस, म्हणून लौकर बरी झालीस. पण तरी लिहून दिलेल्या गोळ्या घेत राहायच्याच बरं का – त्यात हयगय करायची नाही. आणि सहा महिन्यांनी तपासणी करून घ्यायला ये – बरं झाल्याचा दाखला देईन.

गुणी : तो दाखला ठेवा तुमच्याचपाशी ! माज्या धन्याला त्येची कायबी जरूर नाय. मी बरी होऊन परत आली एवढं त्याला मोप हाय ! खरंच डाक्टर, तुमी देव हायसा. तुमच्यापायी माला आज माजं घर परत दिसतंय ! दोगांनी किरपा केली बगा ! एक माज्या म्हायेरचा म्हसोबा आन् दुसरं तुम्ही ! (त्यांचे पाय धरते.)

डॉ. वारंग : अगं अगं ! – भलतंच काय वेड्यासारखं ? जा – नीट जा. नवऱ्याला सांग पोचल्याची चिठी पाठवायला. आणि गोळ्या मात्र अगदी नेमानं घ्यायच्या बरं का ! जा आता.

(ती पुन:पुन्हा मागे वळून पाहात निघून जाते. क्षणभर डॉ. वारंग काम करीत राहातात. मग धनंजय येतो. तो अतिशय अस्वस्थ आहे.)

धनंजय : डॉक्टर – मला तुमच्याशी काही बोलायचंय.

डॉ. वारंग : येस् – ?

धनंजय : तुम्ही रोहिणीला प्रेडनिसोलन देता

डॉ. वारंग : हो – बरेच दिवस देतोय्. गेलं जवळजवळ दीड वर्षं. दुसऱ्या कुठल्याच

औषधाचा परिणाम होत नाही आता तिच्यावर.

धनंजय : पण तिला प्रेडनिसोलन देणं धोक्याचं आहे.

डॉ. वारंग : व्हॉट्स राँग विथ् इट? तिला त्यामुळे आराम वाटतो, हे तुम्ही पाहाताय्.

धनंजय : तात्पुरता आराम! पण त्याचा प्रभाव कमी झाला की, पुन्हा ती आजारीच पडणार की नाही? आणि त्यावर उपाय म्हणून पुन्हा तेच औषध मागणार. एखाद्या अंमली पदार्थासारखी या औषधाच्या आहारी जाणार! त्याची गुलाम होणार! ते मिळावं म्हणून या हॉस्पिटलमध्ये कायम राहाणार. असला घातकी रिलीफ नकोय तिला. तिनं बरं व्हायला हवंय ते प्रेडनिसोलनशिवाय. कायमचं.

डॉ. वारंग : ती कायमची बरी होणं अशक्य आहे, धनंजय.

धनंजय : काय म्हणालात डॉक्टर?

डॉ. वारंग : यू हर्ड मी. ती कधीच कायमची बरी होणार नाही.

धनंजय : हे तुम्ही म्हणावं डॉक्टरसाहेब? एका डॉक्टरनं?

डॉ. वारंग : आजवर मी हे कधीच बोललो नव्हतो. पण सत्य कधी तरी सांगावं लागतंच. ही मुलगी कधीकाळी संपूर्ण बरी होऊन इथनं बाहेर जाईल, असा तिचा किंवा तुमचा गैरसमज असेल, तर तो शक्य तेवढ्या लौकर डोक्यातून काढून टाका.

धनंजय : का? कुष्टरोगी कधीच बरा होत नाही?

डॉ. वारंग : निदान तशी खात्री देता येत नाही.

धनंजय : (चिडून) इतरांचं माहीत नाही, डॉक्टर. पण एक पेशंट असा आहे की, ज्याला बरं व्हायची हंड्रेड पर्सेंट खात्री आहे.

डॉ. वारंग : तुम्ही भावनेच्या आहारी जाताय्, धनंजय!

धनंजय : तुम्हीच तर मला सांगितलंत की, भावनेचा आणि शरीराचा अगदी जवळचा संबंध आहे! पेशंटच्या मनाला उभारी आली, तरच ट्रीटमेंट यशस्वी होते! यासाठीच तुम्ही मला या मुलीची केस हाती घ्यायला लावलीत. तिला आशा दाखवायला सांगितलंत. आणि आता – आता तिचं मन नुक्ती कुठे उमेद घेतंय, अशा वेळी – अशा वेळी तिची कायमची बरं होण्याची आशा तुम्ही नष्ट करणार आहात? तिला प्रेडनिसोलन देऊन?

डॉ. वारंग : मग! दुसरा काय मार्ग आहे?

धनंजय : तिनं रोगाशी झगडलं पाहिजे आणि त्यातून बाहेर पडलं पाहिजे. हे तात्पुरता आराम देणारं औषध ती घेणार नाही – मग काय वाट्टेल ते होऊ दे.

डॉ. वारंग : औषध न घेऊन कसं चालेल? रिॲक्शन आली की, तिला वेदनांनी तळमळावं लागेल! – तडफडावं लागेल!

धनंजय : चालेल. औषधाच्या अंमलाखाली कायम पालेभाजीसारखं लुळंपांगळं जगण्यापेक्षा तडफडणं बरं. ती प्रेडनिसोलन घेणार नाही डॉक्टर – मी तिला ते घेऊ देणार नाही !

डॉ. वारंग : डॉक्टरनं दिलेलं औषध न घ्यायला तुम्ही पेशंटला चिथावणी देणार ! याचा परिणाम काय होईल, माहीताय् ?

धनंजय : माझी या हॉस्पिटलमधून हकालपट्टी होईल – एवढंच ना ! मी कशालाच भीत नाही. मला सगळ्यात महत्त्वाचं वाटतं, ते फक्त त्या मुलीनं माणसात येणं.

डॉ. वारंग : बी प्रॅक्टिकल धनंजय. उद्या ती काही चमत्कारानं बरी झाली, तरी तुम्ही तिला माणसात कसं आणाल ? बाहेरचं जग तिला आपलं म्हणेल ! इंपॉसिबल ! धनंजय, कुष्ठरोगी बरा झाला, तरी जाणार कुठे ? शेवटी कुष्ठधाम हेच त्याचं घर. विचार करा, आणि तिची समजूत काढून तिला औषध घ्यायला लावा. नाही तर परिणाम चांगला होणार नाही ! तुम्हाला हे हॉस्पिटल सोडावं लागेल – आणि ती ! – ती मरणाच्या वेदनांनी तळमळत राहील –

(काळोख)

(प्रवेश पाचवा समाप्त)

## प्रवेश सहावा

(रोहिणीची खोली. रोहिणी पलंगावर तळमळत पडली आहे. ती तापाने फणफणली आहे. दार लोटून बापू आत येतात.)

बापू : बेटी – (घाबरून) बेटी – तू बरी आहेस ना ?

रोहिणी : (अर्धवट गुंगीत) बापू – तुम्ही आलात ?

बापू : हे काय बेटी ? असं कशानं झालं एकाएकी ?

रोहिणी : बापू – तुम्ही कुठे आहात ? मला कोणी तरी – वर उचलतंय् ! हवेत.... अधांतरी....

बापू : अगं – ताप आहे तुझ्या अंगात !.... म्हणून असले चमत्कारिक भास होताहेत तुला !

रोहिणी : बापू – मी या आजारातच मरून जाणार आहे !

बापू : नाही बेटी – असं नाही, काही तरी, वेडंवाकडं बोलायचं !

रोहिणी : धनंजय.... मी मेले.... तर तुम्ही बापूंना.... काय सांगाल ? म्हणावं, तुम्ही इतके श्रम केलेत.... ते सगळे पाण्यात गेले.... बेटी काही बरी झाली नाही....

बापू : बेटी – शुद्धीवर ये बेटी. अगं इथे धनंजय नाही. मी आहे – बापू !

रोहिणी : बापू – तुम्हाला सून कधी येणार ? मला बोलवा हां मोहनच्या लग्नाला – आणि धनंजयनापण बोलवा.... ते माझे अभिभावक आहेत....

बापू : अभिभावक.... ? म्हंजे काय ?

(धनंजय येतो.)

धनंजय : बापू – तुम्ही कधी आलात ?

बापू : आत्ताच ! आलो, तर हिची ही स्थिती ! धनंजय, काय झालं हो हिला ! आत्ताच तुमचं नाव घेत होती. अभिभावक म्हणत होती.... अभिभावक म्हंजे काय ?

धनंजय : अभिभावक म्हंजे पिता, बंधू, सखा.... सगळं काही. एका हिंदी कादंबरीतला शब्द आहे. गंमतीनं सांगितला होता तिला कधी तरी. कुठलं काही तरी बोलतेय.

बापू : शुद्धीत नाहीय हो ती. आता काय करायचं !

धनंजय : घाबरू नका बापू. ही नुसती रिॲक्शन आहे. तिला आपोआप बरं वाटेल.

(डॉ. वारंग येतात.)

डॉ. वारंग : (बापूंना) तुम्ही आल्याचं सांगितलं मला शिपायानं.

बापू : डॉक्टर, ही काय अवस्था झालीय् बेटीची ?

डॉ. वारंग : यांनाच विचारा. मी दिलेलं औषध तुमच्या मुलीनं घेतलं नाही. यांच्या चिथावणीवरून. औषध थांबवल्यानंतर दुसरं काय होणार ?

बापू : (धनंजयला) तुम्ही बेटीचं औषध थांबवलंत ? का ? तिला काय मरू द्यायचं आहे ? बेटीनं तुमची ओळख करून दिली, तेव्हा तुम्ही मला भले गृहस्थ वाटला होता. आणि आता तुम्हीच तिच्या प्राणावर उठलाय् ?

धनंजय : तसं नाही बापू –

बापू : प्रत्यक्ष डॉक्टरांना तुम्ही विरोध करता ? आणि तुमच्या या असल्या तर्कटापायी उद्या माझी मुलगी गेली, तर त्याला कोण जबाबदार ?

धनंजय : बापू, तुम्ही ऐकून तर घ्या.

बापू : मला काहीही ऐकायचं नाही. डॉक्टर, माझ्या मुलीच्या ट्रीटमेंटशी यांचा संबंधच काय ? ह्यांनी या खोलीत पाऊलसुद्धा टाकता कामा नये. मी फक्त तुम्हाला ओळखतो, डॉक्टर. बेटीच्या जिवाची सगळी जबाबदारी मी तुमच्यावर सोपवलीय्. इतर कुणाला मी ओळखत नाही –

धनंजय : (चिडून) अडाण्यासारखं बोलू नका बापू. माझं ऐकून घ्या – तुमची मुलगी कायमची इथेच अडकून पडायला नको असेल तर –

बापू : कृपा करा आणि तुम्ही आधी या खोलीतून बाहेर व्हा –

धनंजय : नाही – मी नाही इथून जाणार ! माझी खात्री आहे – माझी पाठ वळल्या-बरोबर तिला ते विष दिलं जाईल.

डॉ. वारंग : त्यासाठी तुमची पाठ वळण्याची गरज नाही ! मला इथला डॉक्टर म्हणून काही हक्क आहेतच. मी आत्ता, तुमच्यासमोरच, तिला ते औषध देणार आहे – त्याशिवाय तिचं तळमळणं थांबणार नाही.

बापू : प्लीज डॉक्टर – लौकर द्या ! मला तिचे हाल बघवत नाहीत !

(डॉक्टर वारंग औषध देण्याची तयारी करू लागतात.)

धनंजय : थांबा डॉक्टर. हे पत्र वाचा, आणि मग काय ते करा. (त्यांना एक पत्र देतो.)

डॉ. वारंग : पत्र ?

धनंजय : वर्ध्याच्या गांधी फाउंडेशनचं. डॉक्टर रावांच्या सहीचं.

(डॉ. वारंग पत्र फोडून वाचतात.)

बापू : काय प्रकार आहे हा ? डॉक्टर, तुम्ही औषध का नाही देत ?

धनंजय : त्यांना बंदी आहे तसं करायची. वर्ध्याच्या डॉक्टर रावांनी तसं कळवलंय्. या मुलीला कधीच प्रेडनिसोलन द्यायचं नाही, असं म्हटलंय त्या पत्रात. नाइलाजानं ते पत्र द्यावं लागलं मला !

डॉ. वारंग : एकूण तुम्ही वर्ध्याला जाऊन डॉक्टर रावांजवळ चहाडी केलीत !

धनंजय : हो. त्याबद्दल तुम्ही हवं तर मला इथनं घालवून देऊ शकता. पण खरं सांगतो, मला कुणाची चहाडी करायची नव्हती. कुणाला दोषही द्यायचा नव्हता. फक्त एका पेशंटचा, बरं होऊन परत जाण्याचा हक्क हिरावून घेतला जात होता, त्याला कायम हॉस्पिटलात ठेवलं जात होतं – ते होऊ द्यायचं नव्हतं मला !

डॉ. वारंग : मला कुणाचाही कसलाही हक्क हिरावून घ्यायचा नाही ! मला फक्त माझं कर्तव्य करायचंय्. इथला संचालक, या नात्यानं, माझं इमान या हॉस्पिटलशी आहे.

धनंजय : माफ करा डॉक्टर, पण तुमचं इमान चुकीच्या ठिकाणी आहे. तुमचं इमान हॉस्पिटलशी नको, पेशंटशी हवं, माणसाशी हवं. हॉस्पिटल्स काढतात ती माणूस बरा होऊन घरी जावा, यासाठी. ते भरलेलं राहावं म्हणून नाही ! तुम्ही रात्रंदिवस खपताय्, प्रामाणिकपणे झटताय्, पण ते कशासाठी ? फक्त या हॉस्पि-टलच्या प्रतिष्ठेसाठी ! त्याचं नाव गाजावं, त्याची भरभराट व्हावी, यासाठी. त्यासाठीच ही मुलगी जन्मभर इथे राहावी – या वस्तीला तिनं आपलं घर मानावं,

असं तुम्हाला वाटतं. पण विसरू नका – तुम्ही नुसतेच इथले संचालक नाही. त्याआधी तुम्ही एक डॉक्टर आहात. या मुलीला माणसांच्या दुनियेत परत पाठवणं, हे डॉक्टर म्हणून तुमचं काम आहे – आणि तेवढंच तुमचं काम आहे. बस् – दॅट्स व्हॉट यू आर देअर फॉर!

बापू : धनंजय, मला माफ करा. मी तुम्हाला मघा वाटेल तसं बोललो. मला यातलं काही समजलंच नाही हो!

धनंजय : जाऊ दे. मी नाही मनावर घेणार तुमचं बोलणं. तुम्ही बोललात, ते रोहिणीवरच्या प्रेमानं, हे काय मला कळत नाही? डॉक्टर वारंग, मला डॉक्टर रावांच्या ऑर्डर्स आहेत. मी रोहिणीला आजच्या आज वर्ध्याला घेऊन जातोय्. डॉक्टर राव स्वतः तिला ट्रीटमेंट देणार आहेत. तिची प्रेडनिसोलनची सवय कायमची सुटावी म्हणून! बापू, हिला आत्ताच वर्ध्याला न्यायची तयारी करायला हवी.

बापू : आत्ता? अशा स्थितीत?

धनंजय : हो – डॉक्टर रावांनी असंच आणायला सांगितलंय्. याच अवस्थेत.

बापू : मग न्यायलाच हवं. तुम्ही थांबा. मी रिक्षा मिळते का ते बघतो (जातात.)

डॉ. वारंग : ओके, धनंजय, तुम्ही तिला वर्ध्याला घेऊन जाताय ते जा, पण परत इथे आणू नका.

धनंजय : डॉक्टर –

डॉ. वारंग : प्लीज डोंट मिस्अंडरस्टँड मी. मी हा प्रेस्टीज इश्यू करीत नाहीय. पण खरोखरच हिला देण्यासारखं औषध आता या हॉस्पिटलकडे नाही.

धनंजय : का? तिला लॅंपरीन देता येईल.

डॉ. वारंग : लॅंपरीन फार महागडं आहे. आम्हाला परवडणारं नाही. ते कदाचित् मुंबईला मिळेल – वडाळ्याच्या ॲक्वर्थ लेप्रसी होममध्ये.

धनंजय : ठीक आहे, डॉक्टर. रोहिणी इथे परत येणार नाही. वर्ध्याहून परस्पर मुंबईला जाईल. तिला लागेल ती सगळी ट्रीटमेंट देऊन पाहू. पण तिनं बरं व्हायला हवं. ती होईलच बरी. तेवढी जिद्द आहे तिच्यात. तुम्हाला माहीताय् डॉक्टर, गेले तीन दिवस ती अशी तळमळतेय्, पण गुंगीतसुद्धा ती प्रेडनिसोलन घ्यायला तयार नाही. अशी मुलगी बरी झाल्याशिवाय राहीलच कशी? ही झुंज ती अशी अर्ध्यावर सोडायची नाही!

(बापू येतात.)

बापू : रिक्षा आलीय् –

धनंजय : चल रोहिणी –

बापू : बेटी – चालवेल ना दारापर्यंत?

रोहिणी : बापू – तुम्ही मला कुठे नेताय् ! घरी !

बापू : नाही बेटी – घर अजून फार दूर आहे.... फार फार – दूर आहे....

(बापू आणि धनंजय तिला धरून नेऊ लागतात.)

(पडदा)

(अंक दुसरा पूर्ण)

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

(दीड वर्षानंतर, कारंजातल्या, बापूसाहेब सराफांच्या घरातली बैठकीची खोली. सकाळची वेळ. मोहन डेस्कशी बसून हिशेब करीत आहे. बापू एका बाजूला आरामखुर्चीत बसून त्याला काही सांगताहेत. पण त्याचं तिकडे लक्ष नाही. बापू आता बरेच वयस्कर दिसू लागलेत. मोहनही थोडा अधिक प्रौढ वाटू लागला आहे.)

बापू : तर बरं का रे – असं अगदी पहाटेसच स्वप्न पडलं – ऐकतोय्स ना ?

मोहन : हूं –

बापू : आपली बेटी रे – सकाळीच अशी आंघोळ करून – फुलांची परडी घेऊन आपल्या देवघरात उभी – देव्हाऱ्यासमोर –

(मोहन जरा मोठ्यानं आकडेमोड करीत राहातो.)

आणि परडीतलं फूल वाहातेय् महालक्ष्मीला. मी म्हटलं, आज काय विशेष ? तशी काय म्हणाली ठाऊकाय् ?

मोहन : बापू – मला जरा करंबेळकरांच्या मुलीच्या आठी आठ डागांचा हिशेब करून द्यायचाय् – आत्ता बोलावलंय् मी त्यांना दुकानावर —

बापू : (आपल्याच तंद्रीत) तर बेटी म्हणाली – विशेष काय म्हंजे ? बापू, मी बरी झाले आज !

मोहन : आठ वर्षं झाली, तुम्ही दिदी बरी होण्याचं स्वप्न पाहताय्, त्याला —

बापू : ऐकून तर घे —

मोहन : (कागद आवरीत) मला नाही वेळ ऐकत बसायला. मला जायला हवं. तुम्हाला इथे बसून काही कल्पना येत नाही बापू, पण हल्ली दुकानाच्या कटकटी फार वाढल्याहेत. सोन्याच्या प्रत्येक व्यवहारावर बारीक लक्ष असतं सरकारचं. तुम्हाला सांगून तरी काय उपयोग म्हणा ! (बोलतबोलत निघून जातो. बापू

स्वतःशीच किंचित् भ्रमिष्टासारखे पुटपुटत बसून राहातात.)

(अचानक रोहिणी येते. एका हातात बॅग. जवळ पर्स.)

रोहिणी : (येतायेताच) बापू – बापू ऽ

बापू : बेटी....अगं, पुन्हा तेच स्वप्न का काय ?

रोहिणी : स्वप्न नाही बापू. मी खरंच आलेय्. (खाली वाकून त्यांच्या पाया पडते.)

बापू : सुखी हो. अगं, पण एकटी कशी आलीस मुंबईहून ?

रोहिणी : प्रवासात कसली मी एकटी ! – गेलं दीड वर्ष मी मुंबईला अॅक्वर्थमध्ये एकटीनं काढलं – त्याचं कौतुक करा. पण बापू, खरं सांगा, तुम्ही चकित झालात की नाही मला पाहून ?

बापू : मुळीच नाही. मला आधीच ठाऊक होतं, तू येणार ते.

रोहिणी : उगाच काही तरी सांगता !

बापू : मोहनला विचार. आत्ता त्याला सांगत होतो, तू पहाटेसच स्वप्नात आल्याचं. म्हणत होतीस, बापू, मी बरी झाले !

रोहिणी : खोटं नाही बापू – मी खरंच बरी झाल्येय् !

बापू : तू – काय म्हणालीस ? तू बरी झालीस – ?

रोहिणी : हो. तेच तर सांगायला आलेय मी. सगळ्यात आधी तुम्हालाच !

बापू : (अजूनही विश्वास बसत नसल्याप्रमाणे) पुन्हा सांग – पुन्हा सांग मला. तू – खरंच बरी झालीस ?

रोहिणी : हो बापू – (एकदम, न राहावून बडबडत सुटते) मला स्वतःलादेखील खरं वाटत नाहीय. रूटीन चेकपूमध्ये माझ्या टेस्ट्स एकदम निगेटिव्ह आल्या ! मला सांगितलं तेव्हा खरंच वाटेना. मी बरी झाले हे डोक्यातच शिरेना. कारण बापू – माझ्या ना, मनाची तयारीच झाली नव्हती ! मी बरी होणार, हे एक स्वप्नच वाटत होतं मला !

बापू : इकडे ये बेटी. (तिला देवांच्या तसबिरीजवळ घेऊन जातात. जवळची फुलांची परडी दाखवून) यातलं एक तांबडं फूल वाहा महालक्ष्मीला, आणि हात जोड. (ती तसं करते. तेही हात जोडतात.) माझा विश्वासच बसत नाही बेटी ! तू बरी झालीस ! तू बरी झालीस ! (ओरडून) तू बरी झालीस ! (त्यांच्या चेहऱ्यावर विलक्षण आनंद. डोळ्यातून पाण्याच्या धारा लागलेल्या) सगळ्या जगाला सांगायला हवं हे ओरडून ! कुठे गेलेयृत सगळे ? मोहन – अगं सूनबाई – लौकर या ! ऐका हे काय ते ! (मोहनची बायको माधुरी दारात येऊन उभी)

माधुरी : काय हवंय् ?

बापू : अगं ही तुझी नणंद – मोठ्ठा पराक्रम करून आलीय् ! एवढ्या भयंकर रोगातनं सहीसलामत बाहेर पडलीय् !

माधुरी : अगं बाई – ! या त्याच ना – ? आम्ही ऐकलं होतं त्या – ?

बापू : हो – कशी काढली बिचारीनं आठ वर्षं त्या रोगाशी झगडत ! शेवटी सुटली एकदाची त्याच्या तावडीतून !

माधुरी : खरं म्हणता ? मी नव्हतं कधी ऐकलं, या रोगाचं माणूस बरं झालेलं.

(मोहन बाहेर जाण्याची तयारी करून खाली येतो.)

मोहन : कसली बडबड चालवलीय बापू ? आँ – दिदी – ? अगं तू कधी आलीस ?

रोहिणी : आत्ताच !

बापू : अरे, विश्वास नाही बसायचा तुझा – पण खडखडीत बरी होऊन आलीय् ती. मघा तुला सांगत नव्हतो, स्वप्न पडलं म्हणून – ? ते खरं झालं बघ.

मोहन : म्हणजे, दिदी ? – आता तू परत जाणारच नाहीस ?

बापू : अरे वेडा की काय तू ? आता परत कशाला जाईल ती ? चांगली बरी होऊन घरी आलीय् !

मोहन : ते तर झालंच. पण मला आपलं वाटलं – बापू, मी जातो दुकानावर. आज जरा घाई आहे ! दिदी, नंतर बोलू आपण. (मोहन जातो. माधुरी त्याला काही तरी सांगत त्याच्याबरोबर दाराबाहेर जाते.)

रोहिणी : मोहनला आनंद नाही झाला मी आल्याचा ?

बापू : नाही कसा होणार ? चिक्कार झाला असेल मनातून ! पण तो पहिल्यापासून अबोल आहे ! त्यातनं आत्ता घाईत होता —

(माधुरी परत येते.)

रोहिणी : बापू, थोडा चहा करून आणते. घ्याल ना ?

माधुरी : मीच आणते. तुम्ही बसा बापूंशी गप्पा मारीत.

रोहिणी : वहिनी, अगं मी परकी का आहे या घरात, पाहुण्यासारखी वागायला ? मी करते की चहा. तुमचा चालू दे स्वैपाक.

माधुरी : नको नको – तुम्ही नको चुलीशी. मीच करते चहा. (घाईघाईनं जाते.)

रोहिणी : (इकडेतिकडे फिरून पाहात) बापू, घरात फारसा फरक नाही झालेला. मोहनच्या लग्नाच्या वेळी रंग काढलाय् तेवढाच. बाकी तुमचं ते फडताळ, ते डेस्क – सगळं सगळं, अगदी होतं तस्सं आहे.

बापू : हो ना – फक्त एकच फरक झालाय ! हे सगळं आता मोहन वापरतो – मी नाही !

रोहिणी : म्हंजे, बापू –

बापू : आता घरातला कर्ता पुरुष मी नाही, तो आहे. दुकानसुद्धा तोच सांभाळतो. मी फक्त रिकामं बसून दोन वेळा जेवण हादडायचं. (पोकळ हसतात.) अगं, चालायचंच. माझं आता वय झालं. त्यातनं बघ, हल्ली डोकं भरभरतं. एका

ठिकाणी लक्ष लागत नाही. कशात मन गुंतवायचं, तर डोक्यात भलतेच विचार येतात. आजाराचे, डॉक्टरचे, हॉस्पिटलचे !

रोहिणी : बापू – तुम्ही वयाआधीच म्हातारे झालाय् ! माझ्या काळजीनं !

बापू : ( हसून ) झालो म्हातारा तर झालो ! तू बरी झालीस, यात सगळं भरून पावलं ! पण अजून माझा विश्वासच बसत नाही बेटी ! – तू अशी अचानक बरी कशी झालीस ?

रोहिणी : कशी झाले कोण जाणे ! ॲक्वर्थमध्ये दीड वर्ष लॅपरीन मिळाल्यामुळे असेल ! नाही तर गाठी फुटून घाण बाहेर गेली, त्यामुळे असेल –

बापू : नाही बेटी ! – आपण बरे होणारच, अशी जिद्द ठेवलीस, त्यामुळे असेल ! ( थांबून ) तुझ्या त्या धनंजयाला कळवलंस ?

रोहिणी : ( हिरमुसली होऊन ) कुठे कळवणार ? त्यांनी चंदनपूरचं हॉस्पिटल कधीच सोडलं !

बापू : काय, सांगतेस काय ? चंदनपूर सोडलं – ! आणि गेला कुठे तो ?

रोहिणी : कोण जाणे ! त्यांना पाठवलेली पत्रंसुद्धा परत आली.

बापू : अगं, पण जिथे कुठे गेला, तिथला पत्ता त्यानं कळवू नये ?

रोहिणी : नाही कळवला. मला कशाला कळवतील ? मी कोण त्यांची ? मी फक्त कुष्ठरोगाची एक केस ! चंदनपूर हॉस्पिटलमधली ! तिथनं मी निघाले ! बस् ! — आता त्यांचा–माझा संबंधच काय ?

बापू : असं कसं म्हणतेस ? तेव्हा तर तो तुझ्यासाठी इतका तळमळायचा !

रोहिणी : माझ्यासाठी नाही, माझ्या रोगासाठी. त्यांनी माझ्याशी केलेलं मैत्रीचं नाटक, हा नुसता माझ्या ट्रीटमेंटचा एक भाग होता ! समजलं ? ( माधुरी चहा घेऊन येते. बापूंना देते. रोहिणीचा कप तिच्या हातात न देता बाजूला ठेवते. )

माधुरी : आंघोळ करणार आहात ना ?

रोहिणी : हो तर ! प्रवासानं अंग नुसतं चिकचिकलंय् !

माधुरी : मी काढते पाणी. आणि हे बघा, तुम्ही नका धूत बसू कपडे. नंतर धुईल मोलकरीण. पण वेगळे मात्र ठेवा बरं का !

रोहिणी : वेगळे कशाला ठेवायचे ? आता मी बरी झाल्येय् !

माधुरी : ( न ऐकल्यासारखं करीत ) आणि हो, तुमचं सामान सगळं, वरती माडी-वरच्या खोलीतच नेऊन ठेवा. इथे आहात तेवढे दिवस तीच तुमची खोली !

रोहिणी : माडीवरची खोली ? फार भयंकर वाटते हो ती ! चार वर्षं मी त्याच खोलीत तोंड लपवून रडत बसले होते. सगळं वेगळं ठेवावं लागत होतं. पुस्तकं वेगळी, कपडे वेगळे, जेवणाचं ताट वेगळं !

माधुरी : तुमचं जेवणाचं ताट मी वरच घेऊन येईन. तुमच्या खोलीत.

रोहिणी : कशाला ? मी बसेन ना खालीच, सगळ्यांबरोबर !

माधुरी : नको, नको, तुम्ही वरच बसा. वेगळ्या जेवलात म्हंजे ते तुम्हालाही सोयीचं न् आम्हालाही !

(रोहिणी तिच्याकडे पाहात राहाते. भूतकाळाचं भूत दिसल्याप्रमाणे. माधुरी क्षणभर तिच्याकडे पाहाते, आणि मग चहाचे कप उचलून घरात चालती होते.)

(काळोख)

(प्रकाशझोतात गिरिधरजी)

गिरिधर : किती उत्साहानं रोहिणी घरी परतली होती ! आपण मोठा विजय मिळवून परतलोय्, अशा आनंदात ! पण घरी आल्यावर मात्र तिच्या ध्यानात आलं, की आपण बरे झालोय् ते केवळ डॉक्टरांच्या नजरेतून ! लोकांच्या दृष्टीनं मात्र आपण अजूनही कुष्ठरोगीच आहोत ! आता आपल्याला हॉस्पिटलमधे जागा नाही.... आणि घरातही नाही ! पण आता तिनं जायचं कुठे ? हाच प्रश्न आहे....कुठे जायचं तिनं ?

(काळोख)

(प्रवेश पहिला समाप्त)

## प्रवेश दुसरा

(काही दिवसांनंतर. सकाळचा प्रहर संपत आलेला. बैठकीची खोली. माधुरी आणि मोहन.)

माधुरी : कधी जायच्यायत त्या ?

मोहन : कोण ? दिदी ?

माधुरी : आणखी कोण ? त्यांचं जाण्याचं ठरत नसलं, तर तसं सांगा, म्हंजे, मीच नानांकडे जाते.

मोहन : अगं पण आता ती पुरती बरी झालीय् !

माधुरी : कप्पाळाच्या बऱ्या झाल्यायत ! रोग असाध्य, म्हणून हॉस्पिटमधनं घालवून दिलं असेल – दुसरं काय ?

मोहन : अगं हळू – ती ऐकेल वरून.

माधुरी : गप्प राहायला कुणाकुणाला म्हणून सांगणार आहात ? गावात काय चर्चा होत नसेल का ? उद्या लोकांचं बोलणं ऐकून नाना मला न्यायला आले, की सांगा तुम्ही त्यांनाच, काय ते.

मोहन : त्यांना काय सांगायचं ?

माधुरी : लग्नाच्या वेळी नानांची अट काय होती ? असल्या भयंकर रोगाच्या भरीला घालायला मी काही जड झाले नव्हते नानांना. पण तुम्ही अट कबूल केलीत म्हणून —

मोहन : अट कबूल केली म्हणून – ? ती काय शब्दशः का पाळायची असते ? दिदीला वरच्या खोलीत ठेवलं – झालं ! आता काय संबंध येतो, तिचा न् आपला ?

माधुरी : एवढं कसं कळत नाही तुम्हाला ? मी काय दुष्टपणानं का सांगतेय्, तुम्ही बहिणीला घराबाहेर काढा म्हणून ? पण ती घरात राहिली, तर आपल्याला जगणं कठीण होईल ! लोक कायमचं नाव टाकतील – उद्या मुलंबाळं झाली, म्हंजे त्यांचं काय होणार ?

मोहन : उद्याचं उद्या ! दिदी काय, कायम का राहायला आलीय् ? चार दिवसात नोकरी बघेल, नि वेगळी जागा घेईल ! तोवर सहन करायचं, एवढंच !

माधुरी : वाटतंय तुम्हाला ! इथेच राहण्याचा बेत असणार त्यांचा. नाही तर महारोग्यांना कुणी जागा देणाराय ? नोकऱ्या देणाराय ?

मोहन : हळू ! महारोगी हा शब्द वापरायला बंदी आहे आजकाल ! ( जाऊ लागतो.)

माधुरी : हं ! कायद्यानं बंदी झाली, म्हणून मनातली भावना बदलते वाटतं ? ( मोहन गेलेला. माधुरी फणफणत त्याच्या मागून जाऊ लागणार, इतक्यात रोहिणी माडीवरून खाली येते. तिला पाहून )

माधुरी : तुम्ही कशाला खाली आलात ? काय हवं–नको ते वरूनच सांगत जा. आम्ही पाठवून देऊ. तुम्हाला कशाला त्रास – जिना उतरायचा आणि चढायचा ? उगाच थकायला होईल नसत्या श्रमांनी.

रोहिणी : ( बैठकीवरचं वर्तमानपत्र उचलून वर जाऊ लागते. ) पेपर न्यायला आले होते –

माधुरी : एवढ्यातच वर नेताय पेपर ? अजून वाचून व्हायचाय. मीदेखील स्वैपाक झाल्यावर वाचणार होते.

रोहिणी : मी आत्ता देते, पाच मिनिटात चाळून. ( जाऊ लागते. )

माधुरी : अहो तसं नाही. म्हंजे आता नेताय तर तुम्हीच वाचा. पण उद्यापासून लक्षात ठेवा. सगळ्यांचा वाचून झाला, म्हंजे मगच दुपारी नेत जा तुम्ही वर ! आणि नंतर तिकडेच ठेवा तो !

क्र. १८५८ १६/८/८३
वि. नाटक



रोहिणी : ( थांबते. ) का ? सगळयांचा वाचून झाल्यावर का ? माझा हात लागलेला पेपर बाकीच्यांना चालत नाही ?

माधुरी : आता, नाही चालत त्याला काय करायचं ? आपण आपलं समजून असावं, ते बरं.

रोहिणी : वहिनी ! आल्या दिवसापासून पाहातेय ! इकडे हात लावू नका ! — तिकडे पाय ठेवू नका ! हे काय चालवलंय तुम्ही ? आता मी कुष्ठरोगी नाही ! आणि होते, तेव्हासुद्धा, माझा रोग सांसर्गिक नव्हता ! त्या वेळेस तुमचा नवरासुद्धा माझ्या पंगतीला बसून जेवायचा ! अगदी ताटाला ताट लावून !

माधुरी : ( शांतपणे ) तेव्हा चालत असेल तसं. आता नाही चालायचं !

रोहिणी : मी बरी झालेय, असं खुद्द डॉक्टरांनी सांगितलं तरी ?

माधुरी : डॉक्टर पुष्कळ सांगतील, पण माणसाला स्वतःचा काही विचार असतोच की नाही ?

रोहिणी : स्वतःचा कसला विचार ? डॉक्टरचं ऐकायचं नाही आणि आपल्याच मनाचे नियम तयार करायचे, हा शुद्ध अडाणीपणा आहे !

( बापू आंघोळीहून येऊन, तसेच उघड्या अंगानं उभे. )

माधुरी : आहोत आम्ही अडाणी, त्याला काय करायचं ? पण अडाणी म्हणून कुणी आमचं घर बाटवायला निघालं, तर ते नाही आम्हाला चालायचं !

( मोहन घाईघाईनं येतो. )

मोहन : काय झालं ? माधुरी – काय चाललंय ?

बापू : बेटी, तू चल वरती. कशाला इथे वाद घालत बसलीयस ?

रोहिणी : बापू – तुम्हाला हे सहन होतं ? मला बरं करण्यासाठी तुम्ही इतकं रक्त आटवलंत – आणि आता मी बरी झाले हेसुद्धा वहिनीला पटू नये ? ती काय वाटेल ते बोलते, नि तुम्ही दोघे ते मुकाट्यानं ऐकून घेता ?

बापू : कुणाकुणाला समजावणार बेटी ? आता माझी ताकद संपत आली.

माधुरी : काय सोसावं लागलंय त्यांना, ते आम्हाला विचारा. तुम्ही पडला होता जाऊन, तिकडे त्या कॉलनीत. इकडे यांना काय काय ऐकून घ्यावं लागलं लोकांकडून ! दगड मारायचेच तेवढे बाकी ठेवले होते !

रोहिणी : बापू ! – यातलं काहीच तुम्ही मला कधी सांगितलं नाहीत ?

बापू : कशाला सांगायचं ? ज्यानं त्यानं आपला भार सोसायचा असतो, बेटी ! तू नव्हतीस का तिथे एकटीच रोगाला तोंड देत ?

माधुरी : बापूंचंच कशाला, उद्या यांनादेखील ऐकून घ्यावंच लागणाराय की लोकांकडून ! आणि यांनी सोसलं तेच यांच्या मुलांना सोसावं लागणाराय !

मोहन : पुरे झालं माधुरी. तू जा पाहू आपल्या कामाला !

माधुरी : जाते – पण तुमच्या वडिलांनाही सांगून ठेवा ! पूर्वी म्हणे वर्षांच्या वर्षं इथे घरातच ठेवलं होतं यांना गुपचूप ! इतरांचा विचार न करता ! पण म्हणावं, तशी बाटवाबाटवी आता केलीत, तर मला चालायची नाही ! तेव्हा कोणी बोलणारं नव्हतं घरात – बापलेकीचंच राज्य होतं – ! पण आता म्हणावं, बाकीची माणसं आहेत जिवंत ! – ज्यांना महारोग्यांबरोबर मिसळायचं असेल – त्यांनी घरभर घाण नाही कालवायची ! वर जाऊन बसा म्हणावं ! त्यांच्याचबरोबर माडीवर ! ( रोहिणी चिडून माडीवर निघून जाते. )

बापू : बसतो बरं सूनबाई ! माडीवरच जाऊन बसतो ! नाही तरी आता काय वेगळं आहे ? कर्ती माणसं तुम्ही आहात. मी बाजूलाच पडलोय. म्हंजे कुष्ठरोग्याचंच नशीब हे ! ( घरात जातात. )

( मोहन रोहिणीच्या पाठोपाठ माडीवर जातो. )

मोहन : दिदी – ( ती वळून पाहाते. ) तू पाहातेयस दिदी. मी काय करू ?

रोहिणी : मोहन, बापू किती दीनवाणे झालेत ! तू का नाही सांभाळून घेत त्यांना ?

मोहन : म्हंजे काय करू मी ? त्यांना दुकानावर पाठवू ? की घर चालवायला देऊ ? त्यांच्यानं काही काम होत नाही दिदी – त्यांचं डोकंच चालत नाही कशात. सगळीकडे घोटाळा करून ठेवतात.

रोहिणी : माझ्यामुळे झालं हे मोहन. माझ्या काळजीनं त्यांचं डोकं पोखरलं गेलं !

मोहन : नंदाच्या लग्नाच्या वेळी आम्हाला नाना लबाड्या कराव्या लागल्या. तरी लग्नानंतर त्या मंडळींना कुठूनसं कळलंच की, आपल्या सुनेच्या थोरल्या वहिणीला असा असा रोग आहे ! ती माणसं आली आणि बापूंना काय वाटेल ते बोलून गेली. मुलीला परत कधीच माहेरी पाठवणार नाही असं म्हणाली.

रोहिणी : बाई गं – !

मोहन : त्या दिवसापासून नंदा परत कधीच इथे आली नाही. बापूंना ती एक कायमची जखमच झालीय ! म्हणून माझ्या लग्नाच्या वेळेस ठरवलं की, काही लपवायचं नाही ! सगळं स्पष्ट सांगायचं. पण उघड सांगितल्यानंतर मुलगी द्यायला कोण तयार होणार ? उलट सगळे आमचा तिरस्कार करायला लागत. शेवटी ही धुळेकरांची माणसं मिळाली. घरात अठराविश्वं दारिद्र्य, आणि पदरात चार मुली – म्हणून नाना धुळेकर कसेबसे तयार झाले, माधुरीला या घरात द्यायला. तेदेखील अट घालूनच.

रोहिणी : अट ? कसली ?

मोहन : अट अशी. ..की, आमच्या लग्नानंतर तुझी सावलीदेखील या घरावर पडता कामा नये !

रोहिणी : ( किंचाळून ) काऽय ?

मोहन : अट भयंकर होती. पण मी ती मानली. कारण दुसरी मुलगी मिळणं कठीणच होतं. मला तर गरज होतीच. पण नंदादेखील सासरी गेलेली. घरात बाईमाणूस नाही. तेव्हा अट कबूल करून झालं तरी लग्न करणं भाग होतं. त्यातून मला वाटलं, – मला वाटलं –

रोहिणी : तुला वाटलं की, मी इथे कधीच परत येणार नाही ! तुला वाटलं की, मी तिथेच सडून मरून जाणार ! असंच वाटलं ना तुला ?

मोहन : वाईट वाटून घेऊ नकोस दिदी ! पण तू बरी झालीस हे लोकांना खरंच पटणार नाही !

रोहिणी : लोक....लोक ! तुला आठवतं मोहन ? लोकांच्याच भीतीनं आपण माझा रोग दडवला ! माझ्यावर कुष्टरोगाचा शिक्का बसेल, या भीतीनं बापूंनी मला चंदनपूरला पाठवायला उशीर केला....आणि रोग बळावला ! कोण मारणार होतं शिक्का ? तुझे हे लोकच ना ? आणि एवढं झालं तरी घाबरत राहायचं या लोकांना ?

मोहन : न घाबरून कसं चालेल दिदी ? उद्या तुला नोकरी देणाराहेत, जागा देणाराहेत ते हे लोकच....त्यांना, तू बरी झालीस, हे पटलंच नाही तर....?

रोहिणी : तर मी तुझ्याच दारात अडगळ होऊन पडून राहीन, हीच – हीच भीती वाटतेय् ना तुला ? तुला आणि तुझ्या बायकोलाही ? बोल ना – बोलून टाक – ! ( क्षणभर स्तब्धता. ) मोहन – मी माझ्या रोगाच्याच तंद्रीत होते रे ! मला कळलंच नाही, काळानं सारं किती झपाझप बदललंय् ते ! माझं घर – माझी माणसं – सगळंच बदललंय् .

मोहन : तूही बदलली असतीस दिदी माझ्याचसारखी. आमच्या वाट्याला आलेला लोकांचा तिटकारा – तू पाहिला असतास तर. एका परीनं तू चंदनपूरला सुरक्षित होतीस. जगाला तोंड देत होतो, ते आम्ही !

( खाली गिरिधरजी येतात. )

गिरिधर : ( हाक मारीत ) रोहिणी ऽ

( माधुरी बाहेर येते. )

माधुरी : कोण – भावोजी का आलेयत ? बऱ्याच दिवसांनी झाली फेरी ?

गिरिधर : हो – ही आल्याचं कळलं, म्हणून मुद्दाम आलो.

माधुरी : तुमच्यापर्यंत पोचलं वाटतं ? म्हणजे आता सगळ्याभरच कळलं असणार !

गिरिधर : बाकी सूनबाई, रोहिणी बरी होऊन आली, हा तुझाच पायगुण म्हटला पाहिजे !

माधुरी : आमचा कसला पायगुण ? आम्ही गरीब माणसं ! नशीबात असेल ते एकेक भोगतोय् झालं ! ( मोहनला हाक मारीत ) अहो – येताय ना ? भावोजी आलेयत.

( मोहन, रोहिणी खाली येतात. )

माधुरी : तुमचं आंघोळीचं पाणी निवून चाललंय् ! देऊ ना काढून ?
मोहन : हो – चल. ( माधुरी मोहनला घेऊन जाते. )
गिरिधर : तू पुरती बरी झालीस, असं कळलं !
रोहिणी : झाले खरी – पण ते कुणी मानलं पाहिजे ना !
गिरिधर : का ? सूनबाई काही बोलली वाटतं ? ती तोंडानं थोडी फटकळ आहे, तिकडे लक्ष द्यायचं नाही !
रोहिणी : फटकळपणाचं काही नाही भावोजी. पण राग येतो तो अडाणीपणाचा. त्यांना शंभरदा सांगितलं की, मी पूर्ण बरी झालेय् – तरी त्यांचा विश्वासच बसत नाही !
गिरिधर : जरा दमानं घे. अगं ती मुलगी मूळची गरीबाची. तिला हे घर दिसलं, त्याचीच अपूर्वाई वाटतेय् . इथे दुसरं कुणी येईल – आपल्यावर सत्ता गाजवील याची भीती वाटतेय् तिला. म्हणून मग तुझ्या आजाराचं भांडवल !
( बापू येतात. )
बापू : जावईबापूंचा आवाज ऐकला. पण जरा थरथरल्यासारखं होत होतं. पटकन् उठवेना. संतापसुद्धा सोसत नाही आजकाल.
गिरिधर : कुणावर संतापला होता ?
बापू : स्वतःवरच. विशेष काही नाही. नेहमीचंच आहे. गोष्टी बिघडताना उघड्या डोळ्यांनी पाहाव्या लागतात, न् आपल्याला काही करता येत नाही, याचाच संताप येतो. बेटी काय सांगत होती तुम्हाला ?
गिरिधर : काही नाही. असंच इकडचं तिकडचं.
बापू : नाही कसं ? गिरिधरजी, पोरीची कुचंबणा मला समजतेय् . ती बरी होऊन इथे आली, तेव्हा मला आभाळ हाती आल्याचा आनंद झाला. पण आता लक्षात येतंय् – की मी तिला चार दिवस राहासुद्धा म्हणू शकत नाही ! मी बोललो, तर मलाच बाहेर काढतील ! शरीराच्या या अवस्थेत आता मी कुणाच्या आधाराला जाऊ ? पोरीबरोबर घराबाहेर पडलो, तर तिलाच माझी अडगळ व्हायची ! म्हणून राह्यलोय् इथे – पण हे घर माझं नाही ! मोहनचं आहे ! बेटीचा पत्ता चुकला ! ती निघाली माझ्या घरी यायला ! आणि पोचली मोहनच्या घरी ! ( हे सगळं बोलणं भ्रमिष्टासारखं चाललंय् . ) अरे, माझी पोरगी पुन्हा शुद्ध होऊन आली – तर तिला महारोगी म्हणता ? तुम्ही – तुम्ही चांगल्या माणसांचे महारोगी बनवता ? त्यांना सांगता – जा – बसा कोपऱ्यात जाऊन ? तुमचा विटाळ नको आम्हाला ? तुम्ही – तुम्ही माणसांचे महारोगी करता ? ( बापूंचा आवाज चढलेला ऐकून माधुरी, आणि आंघोळ आटोपलेला मोहन धावतच येतात. )
गिरिधर : शांत व्हा – शांत व्हा बापू – ( माधुरी पाणी घेऊन येते. )
बापू : मला – मला पाणी देऊ नकोस – भांडं विटाळेल ! – मला महारोग झालाय् !

अहो गिरिधरजी, मला झालाय् की नाही महारोग? महारोगाचे खूप प्रकार असतात हो! शरीराचा रोग, मनाचा रोग! मला मनाचा महारोग झालाय्! म्हणून मी यांच्यातला नाही! हे सगळे मला दूर ठेवतात!

गिरिधर : कोणी नाही तुम्हाला दूर ठेवीत! – तुम्ही जरा शांत व्हा!

बापू : यासाठी – यासाठी गिरिधरजी, तुम्हाला सांगत होतो, की बेटीला चंदनपूरला पाठवू नका! ती गेली आणि तिचं घर गेलं! खरं ना बेटी? खरं ना? म्हणून मी तुला घराबाहेर पाठवायला तयार नव्हतो! घर – हरवतं – म्हणून!

मोहन : बापू – ते सगळं मागे पडलंय् – तुम्ही शांत व्हा बरं – चला, थोडा आराम करा.

बापू : कुठे नेतोय्स मला? माडीवर? बेटीच्या खोलीत?

मोहन : नाही बापू – तुम्ही माझ्या खोलीत चला. चला ना.

बापू : मी नाही येणार – माझ्या लक्षात आलंय्. माझ्या पाठीमागे, माझ्या बेटीला, तुम्ही घराबाहेर काढणार आहात!

गिरिधर : नाही बापू – तुम्ही आराम करा. मी आहे बेटीजवळ! (मोहन बापूंची समजूत घालून त्यांना घेऊन जातो. माधुरी चहाचे कप घेऊन घरात जाते. उरतात गिरिधर नि रोहिणी.)

रोहिणी : भावोजी, काय झालं हो हे बापूंचं?

गिरिधर : घाबरू नकोस. असे ॲटॅक्स अधनंमधनं येतात त्यांना. थोड्या वेळानं आपसूक बरं वाटतं.

रोहिणी : माझं चुकलं भावोजी – मी इथे यायलाच नको होतं! आले, तर राहायला नको होतं! पण तुम्हीच सांगा – जाऊ कुठे मी?

गिरिधर : मी एकटा – लोक नाही नाही ते बोलतील, नाही तर, माझ्या घरी चल, म्हटलं असतं.

रोहिणी : नको – माई गेल्यापासून तुमच्या परीनं तुम्हीही वनवासीच आहात! तुमच्या कटकटी आणखी कशाला वाढवू? पण भावोजी, माणसाला कुठे ना कुठे तरी घर हवंच, नाही? नाही तर आपण कोण आहोत, हेच त्याला समजेनासं होतं. जसं काही, तो राहतो ते घर, हीच त्याची ओळख असते. माझंच बघा ना. मी हॉस्पिटलमधे होते तेव्हा पेशंट होते. पण आता मी कोण आहे!

(दाराशी, 'पोस्टमन' असा पुकारा होतो, आणि एक पाकीट आत येऊन पडते. गिरिधरजी जाऊन ते उचलतात.)

गिरिधर : अगं, तुझ्या नावाचं पत्र आहे!

रोहिणी : माझ्या नावाचं? मी इथे आलेय्, हे कुणाला ठाऊक असणार!

गिरिधर : गणोरीहून आलंय्. (तिला पत्र देतात.)

रोहिणी : (पाकीट फोडत) गणोरी ? गणोरीला कोण आहे ? (पत्र काढून वाचू लागते.)

(तिच्यावर प्रकाशझोत. प्रकाशझोतात धनंजय येतो.)

धनंजय : मी आहे रोहिणी.

रोहिणी : तुम्ही ? होता कुठे इतके दिवस ?

धनंजय : रागावलीस ? अगं माझा काही ठिकाणा नसतो. पत्र लिहायलासुद्धा फुरसत नसते.

रोहिणी : एवढं काय काम आरंभलंय् ?

धनंजय : चंदनपूर सोडलं. आता गावोगाव छोटी उपचार केंद्रं काढत भटकतोय्. रोगाची सुरुवात असतानाच औषधांना मारा करायचा, अशी कल्पना आहे. त्यासाठी गावोगाव स्वयंसेवक तयार करतोय.

रोहिणी : धनंजय – तुम्ही एवढं जगाचं काम करताय् ! आणि मी मात्र इकडे रडत बसलेय् ! स्वतःचं काय होईल म्हणून....

धनंजय : कामासाठीच वर्ध्याला गेलो होतो. तिथे कळलं की, तू बरी होऊन इकडे आलीस. शब्दात मावणार नाही एवढा आनंद झाला. माझ्या कामासाठी मला दुप्पट जोर आला !

रोहिणी : मी मात्र रोगाशी झगडतानाच पार थकून गेलेय्. आता जगाशी झुंज द्यायची शक्तीच नाही माझ्यात.

धनंजय : असं नाही चालायचं. माझी खात्री आहे, ही दुसरी झुंजही तू जिंकशील. ऊठ ! इथे दुसऱ्याला भार होत, बोलणी खात, कुजत राहायचं नाही ! चल – !

रोहिणी : पण जाऊ कुठे मी ?

धनंजय : डोंट वरी. तुझा मार्ग तुला आपोआप सापडेल.

रोहिणी : तुमच्याकडे येऊ ?

धनंजय : माझ्याकडे ? माझा काय ठिकाणा आहे ? शिवाय मला विचारशील तर तू आता कुष्ठरोगाशी संबंधच ठेवायचा नाहीस. तुला चारचौघींसारखं व्हायचंय् ना ? मग एकटी राहा – नोकरी कर. पण परत मागे वळून पाहू नकोस. तुझ्यात जिद्द आहेच. धाडसही आहे. थोडी उभारी घे. पल्ला लांबचा नाही. (धनंजय गेलेला. प्रकाश पूर्ववत्.)

रोहिणी : (पत्र वाचीत)...थोडी उभारी घे. पल्ला लांबचा नाही. तुझा, धनंजय.

गिरिधर : कुणाचं पत्र होतं ?

रोहिणी : (पत्र मिटत) माझे अभिभावक – धनंजय.

गिरिधर : काही विशेष ?

रोहिणी : मला इथून जायला हवं भावोजी. कितीही थकले, तरी आता ही दुसरी

लढाई लढायलाच हवी.

गिरिधर : पण कुठे जाणारायस तू?

रोहिणी : कुठे – ते मलाही माहीत नाही. मुक्कामाला पोचले की, पत्र टाकीन. तोवर माझी काळजी करू नका.

(काळोख)

(प्रकाशझोतात गिरिधर)

गिरिधर : रोहिणी घरातून बाहेर पडली खरी, पण कुठे जायचं तेच तिला समजत नव्हतं. तिनं डॉक्टर रावांकडून चिठ्ठ्या घेतल्या, आणि ती चार–सहा ठिकाणी जाऊन भेटली. सगळे दया दाखवायचे, पण टाळायला बघायचे. निरनिराळी निमित्तं सांगायचे. कुठे वयाचं, कुठे लायकीचं. पण सगळ्यांच्या नजरेत एकच भाव – इथे निरोगी लोकांना नोकऱ्या नाहीयत, तिथे कुष्ठरोग होऊन गेलेल्या मुलीला कुठली नोकरी! बरं तर बरं — रोहिणी विद्रूप झाली नव्हती! हातां-पायांवर गाठींचे व्रण आले, तेवढेच! नाही तर अधिकच कठीण गेलं असतं! शेवटी पुनर्वसन खात्यानं तिला एसेस्सी बोर्डात नोकरी मिळवून दिली!

(काळोख)

(प्रवेश दुसरा समाप्त)

## प्रवेश तिसरा

(पुण्याच्या महिला निकेतनमधली एक खोली. डॉ. वारंग खुर्चीवर बसले आहेत. समोर रोहिणी.)

रोहिणी : तुम्ही कसे आलात पण इकडे?

डॉ. वारंग : डॉक्टर रावांकडून मागेच पत्ता घेतला होता, तेव्हाच ठरवलं होतं. कधी पुण्याला गेलो तर तुला भेटल्याशिवाय राहायचं नाही!

रोहिणी : या पंधरवड्यातच ही खोली मिळाली महिला निकेतनमधली. नाही तर सुरुवातीला खूप हाल होते.

डॉ. वारंग : बरी दिसतेय् ही जागा?

रोहिणी : हो! स्वच्छ आहे, हवेशीर आहे! लेडीज् हॉस्टेलच आहे – तेव्हा सोब-

तीचा प्रश्न नाही !

डॉ. वारंग : नोकरी काय म्हणतेय् ?

रोहिणी : चांगली आहे ! पर्मनंट आहे. पगार बरा आहे. मुख्य म्हणजे या नोकरीला प्रतिष्ठा आहे !

डॉ. वारंग : रोहिणी, मी एक सूचना म्हण, विनंती म्हण, करायला आलो होतो. तुला कल्पना कशी वाटते, ते बघ.

रोहिणी : सांगा तर खरी.

डॉ. वारंग : तू आपल्या हॉस्पिटलच्या स्टाफवर का येत नाहीस ?

रोहिणी ( धक्का बसल्याप्रमाणे ) हॉस्पिटल ? डॉक्टर – तुम्ही मला चंदनपूरला परत बोलावताय् ?

डॉ. वारंग : हो. जी मुलगी एके काळी आमच्याकडे पेशंट म्हणून आली होती, ती आता बरी होऊन इतर पेशंट्सची सेवा करू शकते, हे आम्हाला भूषणास्पद नाही का ? आम्हाला....आणि तुलाही !

रोहिणी : तेच शब्द ! पुन्हा तेच !.... भूषण ! अभिमान ! .... त्याच नजरा .... पाहुण्यांच्या – पत्रकारांच्या ! दयेच्या नजरा !.... कुष्ठरोगी असून एवढं केलं !.... स्वतः पेशंट असून आता....माफ करा डॉक्टर. मला आता कुष्ठरोगाशी संबंधच ठेवायचा नाहीय ! मी त्यावर मात केली, हे सांगण्यासाठीसुद्धा !

डॉ. वारंग : तुझी मर्जी. पण एक लक्षात घे – आमच्या इथली नोकरी तशी सोयीची आहे. तुझा राहाण्याच्या जागेचा प्रश्न तिथे आपोआप सुटेल – तुला राहायला फ्री क्वार्टर्स मिळतील. शिवाय आपल्याच माणसांची सोबत मिळेल ! बघ, विचार कर.

रोहिणी : नको डॉक्टर. मला जगायला नव्यानं सुरुवात करायचीय्. नवं पान उलटायचंय्. पूर्वीच्या दिवसांची ती भयंकर आठवणसुद्धा आता नको. मला आता परत तिथे पाऊलही ठेवायचं नाही. मला घर करायचंय्. पण ते ऐन लोकवस्तीत. तुमच्या हॉस्पिटलसारख्या ठिकाणी, लोकांपासून दूर, रानावनात नाही.

डॉ. वारंग : तुझा पक्काच निश्चय ठरलाय् – तेव्हा मी तरी काय बोलणार ? पण मनात काही ठेवू नकोस. आम्ही तुझीच माणसं आहोत – कधी कसली मदत लागली, तर संकोच न करता ये.

रोहिणी : गैरसमज करून घेऊ नका डॉक्टर, पण माझ्यासारख्या एखादीला नुसतं चारचौघांसारखंच होण्यासाठीसुद्धा शर्थीनं लढावं लागतं ! कधी संपेल ही लढाई, कोण जाणे ! ( थांबून ) आमच्या ऑफिसातल्या बायका की नाही, डॉक्टर, एकसारख्या घरच्या गोष्टी बोलतात. कुणाचं सासूशी पटत नाही, कुणाच्या मुलाला गोवर आलेलं, कुणाच्या नवऱ्यानं गोदरेज कपाट घेतलेलं – गंमत येते ऐकायला.

लोकांना ज्या गोष्टी साध्यासाध्या वाटतात, संसारातल्या कटकटी वाटतात, त्या ऐकताना मी अशी हरखून जाते! वाटतं, आपण एवढा पराक्रम गाजवला रोगातून बरं होण्याचा! पण ऑफिसातल्या चार बायकांना घराचं जे सुख मिळतं, ते काही वेगळंच आहे. मला ते या जन्मी लाभणार नाही! मी आपलं त्यांचं बोलणं ऐकायचं नि मुकाट बसायचं —

(दारावर टकटक होते.)

रोहिणी : कोण आहे?

(बाहेरून ' हू छू– विमलाबेन!')

या विमलाबेन. दार उघडंच आहे. (विमलाबेन आत येतात. भाषा घेडगुजरी.)

विमला : खालती क्लार्क बोल्ला की, वरती डॉक्टर वारंग आले हाय – तवा म्हटले, मिळूनशान यावा –

रोहिणी : (डॉक्टरना) या विमलाबेन – आमच्या या महिला निकेतनच्या संचालिका.

विमला : डॉक्टर वारंग, याने लेप्रसी एक्स्पर्ट. ॲम् आय राइट?

डॉ. वारंग : येस.

विमला : लेप्रसी पेशंटसाथे महिला निकेतनला लई सिंपथी हाय. एव्हरी इअर आम्ही एंटरटेनमेंट प्रोग्रॅम करीने लेप्रसी होमला चेरिटी करते. लास्ट इअर तर आनंदवनला एक पिकनिकपण काढला होता. समदे रेसिडेंट लेप्रसी होम बघून आला. थोडे लोकनी तो डोनेशनपण दिला.

डॉ. वारंग : वा! तुमच्यासारख्या संस्थांनीच या रोगाविषयी लोकांचे गैरसमज दूर करायला हवेत.

विमला : तुमची आणि रोहिणीबेनची ओळखान कुठली? फेमिली फ्रेंड?

डॉ. वारंग : ती लेप्रसी हॉस्पिटलमधे होती ना आमच्या. चंदनपूरला. वुई आर व्हेरी प्राउड ऑफ हर. तिथे राह्यली, नंतर रोगातून साफ बरी झाली – आणि आता स्वतःच्या पायावर उभी राहिली!

विमला : व्हेरी क्रेडिटेबल!

डॉ. वारंग : बरं. येतो मी. येतो विमलाबेन. रोहिणी. धनंजय भेटले होते?

रोहिणी : ते कुठून भेटणार डॉक्टर? मी बरी झाले, म्हणजे त्यांना कायमची मुक्ते नाही का? (डॉक्टर जातात.)

विमला : रोहिणीबेन, तू माझी छोकरी जेवी हाय. तुला सांगायला लई दुख होतो. पण तुला कालपासून ही रूम सोडायला पडेल.

रोहिणी : काय? उद्या रूम सोडायची?

विमला : आज सोडली तर बरा. पण एक फुल डेचा नोटीस ॲडव्हान्समधे दिला. काले सांजे गेला तर चालणार.

रोहिणी : पण का सोडायची जागा ? भाडं तर मी –

विमला : भाडेचा काय सवाल नाय – पण तुमी आमाला एक बात पहिले सांगितली नाय. तुमी लेप्रसी पेशंट हाय म्हणून सांगितला असता, तर आमी कवापण रूम दिला नसता.

रोहिणी : पण आता मी बरी झालेय, हे नाही का आत्ता सांगितलं तुम्हाला डॉक्टरांनी ?

विमला : तसा तो कोईबी डॉक्टर बोलेलच. पण कुष्ठरोग कोई वखते क्युअर नाय होते.

रोहिणी : ( आकांतानं ) असं तुम्हाला वाटतं. पण ते खोटं आहे. कुष्ठरोग बरा होऊ शकतो. विश्वास बसत नसेल, तर हे बघा. ( फडताळातून फाइल काढून दाखवीत ) मुंबईच्या ॲक्वर्थ लेप्रसी होमचं हे सर्टिफिकेट. हे डॉक्टर रावांचं लेटर. हा मेडिकल टेस्टचा रिपोर्ट. अहो, मला एसेस्सी बोर्डानं नोकरी दिली, ती काय, मी निरोगी असल्याशिवाय ? मला घ्यायच्या आधी, माझी मेडिकल एक्झॅम घेतली नसेल का त्यांनी ?

विमला : ( शांतपणे, फाइल परत देत ) हे समदा तुमच्या कपाटमंदी ठेवून टाका. आम्ही काय हे सर्टिफिकेट महिला निकेतनच्या पात्रीस रेसिडेंटना दाखवू नाय शकते. तुमी इकडे राह्यला तर मोठ्ठी स्कॅंडल होणार समदे रेसिडेंट भराभर रूम सोडून जाणार. निकेतनचा नाव खराब होणार. पर्मनंटली.

रोहिणी : म्हंजे माझ्यासारखीला इथे जागाच नाही ?

विमला : नाय बेन. आमचे संस्थाचा रूल्स एकदम स्ट्रिक्ट हाय. लेप्रसी पेशंटला आम्ही इथे कसा ठेवेल ?

रोहिणी : ( चिडून ) बाई, मी बरी झाल्येय् हे तुम्हाला पटायला मी तुमच्यासमोर डोकं फोडून घेऊ का ?

विमला : डोंट बी एक्सायटेड यंग लेडी. माणसाला सगळा दुख सोसावा लागतो. भगवानवर भरोसा ठेवायचा. ( थांबून ) काले सांजेसुधी तुमी राहून जावा, पण तेच्यावरती तुमी येथे राहू नाय शकते !

( विमलाबेन जाते. रोहिणी, काही क्षण, आघात झाल्यासारखी बसून राहाते. मग जिवाचा धडा करून उठते, आणि कपड्यांची बॅग कॉटखालून बाहेर काढते. एवढ्यात कुणी तरी दारावर टकटक करते. )

रोहिणी : कोण आहे ?

बाहेरून : बाई – तांदूळ हवेत का ?

रोहिणी : नकोयत तांदूळ.

( आता आवाजाची मालकीण दार ढकलून सरळ आतच येते. हातात पिशवी, डोक्यावर तांदळाची मोटली, अशी. )

ती : बाई, घ्या – चांगला तांदूळ हाय – रेशनच्या तांदळापरीस घा पटींनी चांगला – काळ्या बाजारातला असला, तरी कसा पांढरा सफेद हाय बगा –

रोहिणी : नको म्हटलं ना –

(एकदम काही तरी लक्षात येऊन नीट बघते. त्याच वेळी तांदूळवालीही आश्चर्यानं चीत्कारते)

ती : ताई – तुम्ही !

रोहिणी : गुणी !

गुणी : ताई, तुमी बऱ्या जालात ? हितं ऱ्हाता तुमी ? आन् तुमची मानसं – ?

रोहिणी : ते सांगते नंतर. आधी, तू इथे कशी, ते सांग.

गुणी : मी तांदूळ विकतो बाई त्यापायी रोज कर्जतहून हितं येतो.

रोहिणी : का ? हे काम का करावं लागतं तुला ?

गुणी : काय करावं ताई ? भिकेचा भाकरटुकडा खान्यापरीस तर ह्ये बरं. कंदीकंदी त्येबी करावं लागलं ताई, पोट जाळाया. भीक मागाया हात फुडं करताना, मरन ब्येस असं वाटायचं. मग म्हनूलं, काळा बाजार तं काळा बाजार – उपाशी तर मरावं लागत न्हाई !

रोहिणी : अगं पण – तू नवऱ्याकडे ना गेली होतीस ? मग ?

गुणी : गेलो खरी ताई खुळ्यागत, पर गावानं हुसकून लावलं, म्हारोगी गुणी आली, म्हून. दगडं, काठ्या घिऊन मागं लागलं – गावच्या वढ्याचं पानीबी काय पिऊ न्हाई दिलं.

रोहिणी : पण आता मी बरी झाल्येय, असं नाही का सांगितलंस तू ?

गुणी : कुनाला सांगनार वं – आन् ऐकून कोन घेनार ?

रोहिणी : आणि ऐकलं, तरी ते पटणार कुणाला म्हणा !

गुणी : ताई – मानसाची औलादच कुत्र्यालांडग्याची – कोन भाईर पडला, का आयताच मिळाला तेनला मांसाचा गोळा ! समदी कुत्रीलांडगी मग एक होऊन त्येला लोळवून लोळवून तोडून फाडून खानार !

रोहिणी : पण तुझा नवरा नाही का धावून आला तुझ्या मदतीला ?

गुणी : कशापायी यील ताई ? त्येनं मला इस्पितळात टाकल्याबरूबर दुसरं लगीन क्येलं वाजतगाजत – आता घरात माज्या सवतीचं बाळ रांगतंय ताई !

रोहिणी : खरं सांगतेस ?

गुणी : टकुऱ्यात धोंडा बसल्यावानी जालं, ऐकलं तवा ! रोहिणीताय, माज्या धन्यानं मला पुरतं डुबिवलं ! ज्येच्या भरोशावर दोन वरसं काडली, त्येनंच असा गळा कापला, म्हंजी कुनाला सांगनार वं !

रोहिणी : खरं आहे गुणे – जगात कुणाचाच भरंवसा नाही !

गुणी : का ताई– तुमास्नीबी घरच्यांनी वाऱ्यावर सोडलं जनू ?

रोहिणी : तुझ्यात न् माझ्यात काही फरक नाही गुणे. जातीपातीचा नाही, की गरीबी–श्रीमंतीचा नाही. कुष्ठरोगी ही एकच जात आपली सगळ्यांची ! ( थांबून ) थांब – चहा ठेवते.

गुणी : नको ताई – चाय नको. पाणी द्या वाइच.

रोहिणी : ( तिला पाणी देत ) रोज कर्जतपासून पुण्यापर्यंत फेऱ्या मारतेस, पैसे तरी पुरेसे मिळतात का ?

गुणी : कुठलं पैसं ताई – पोलिसांनी पकडलं, तं जवळ हाय–न्हाई ते काढून घेत्यात. वर आणखी दंडुक्यानं मारत्यात. कुठंबी, कसंबी – लई जपून सांभाळून करावा लागतोय धंदा.

रोहिणी : मग ? चालतं कसं तुझं ?

गुणी : तो तांदूळवाला शेठच गिऱ्हाईक गाठून घेतो ना !

रोहिणी : गिऱ्हाईक ?

गुणी : हां ताई – आता तुमच्यापाशी कशापाशी लपवायचं ! माला ढोरावानी हुसकून लावणाऱ्या गावाला शरम वाटली न्हाई – माज्या धन्याला शरम न्हाई – तर मला कशाची शरम ? एक दिसाआड ऱ्हातो पुन्यातच आन् मिळवतो गिऱ्हाईक !

रोहिणी : गुणे – !

गुणी : कशी येडीखुळी हाय बगा ताई दुनिया ! माज्या हातचं आन् माज्या घर-धन्याला चालत न्हाई ! पर मी इकतो त्यो तांदूळ समद्या दुनियेला चालतो ! माजा धेह माज्या धन्याला नकोसा जाला – आता समद्या पुरुषास्नी त्यो गोड वाटतो !

रोहिणी : पुरे गुणे — ! गुणे, तुझं असं व्हायला नको होतं गं !

गुणी : रडू नका ताई ! माज्यासारख्या कैक असत्याल ! कुनाकुनासाठी रडाल ? जातो मी. आज शेठचा दीस हाय. त्येच्याकडं लई टायमात जावं लागतं. यईन पुना कंदी. तुमी हितंच हायसा न्हवं ?

रोहिणी : नाही गुणे. माझा आज इथला शेवटचा दिवस.

गुणी : म्हंजी ? आन् हितनं कुटं जानार तुमी ?

रोहिणी : कोण जाणे, कुठे जाणार !

गुणी : मालाबी एक घर न्हाई. सत्रा ठिकाणी ऱ्हायतो. नाय तर चला संगट म्हनलं असतं.

रोहिणी : जा तू गुणे. नशीबात असलं, तर पुन्हा अशीच योगायोगानं गाठ पडेल.

गुणी : काय काळजी करू नका ताई. देव तुमाला चांगलं दीस दावील. मला एक

इसारला, म्हून समद्यानाच थोडा इसरल त्यो ? जातो हां. ( जाते. )

( रोहिणी कोसळल्यासारखी पलंगावर अंग टाकते. पदरानं तोंड झाकून पडून राहाते. गुणीची हकीकत ऐकून ती पराकोटीची बेचैन झाली आहे. आता आपल्यापुढे तरी काय वाढून ठेवलंय, या चिंतेनं. दुःखापेक्षाही तिला काळजी अधिक वाटतेय.

अंधार दाटत जातो. मग दारावर टकटक होते. ती दार न उघडता तशीच पडून राहाते.

क्षणभर वाट पाहून, दार ढकलून धनंजय आत येतो. )

धनंजय : रोहिणी –

रोहिणी : तुम्ही – ? ( उठून दिवा लावते. )

धनंजय : कोंढवा लेप्रसी होममध्ये आलो होतो – रस्त्यात एसेस्सी बोर्डातला एक मित्र भेटला. त्यानं तुझा पत्ता सांगितला.

रोहिणी : वेळेवर आलात ! उद्यापासून हाही पत्ता बदलणार आहे !

धनंजय : म्हंजे ? ही जागा सोडणारायस तू ?

रोहिणी : सोडावी लागणार आहे. चालकांनी नोटीस दिलीय् मला. माझ्या रोगाबद्दल कळल्यामुळे.

धनंजय : पण तू सांगायचं नाहीस त्यांना – ?

रोहिणी : काय सांगायचं धनंजय ? सगळीकडे अडाणीपणाचा अंधार आहे. आमच्या या संचालिकेसारखे – सुशिक्षित म्हणवणारे लोकसुद्धा, अजून, कुष्ठरोग बरा होत नाही, असं समजतात ! कुष्ठरोग्यांना हुडुत् हुडुत् करतात !

धनंजय : मग आता – कुठे जाणारायस तू ?

रोहिणी : चंदनपूरला. हॉस्पिटलमध्ये परत.

धनंजय : का ?

रोहिणी : डॉक्टर वारंगांनी नोकरी ऑफर केलीय. तिथे गेले, म्हंजे राहाण्याच्या जागेचा प्रश्नही आपोआप सुटेल.

धनंजय : नाही रोहिणी, काहीही झालं तरी तू चंदनपूरला परत जायचं नाहीस.

रोहिणी : धनंजय – पूर्वी डॉक्टर वारंग सांगायचे, ते आपल्याला पटत नसे – पण आता तेच खरं वाटतं. कुष्ठरोग्याची खरी जागा कुष्ठधामातच. तो कितीही सुधारला, तरी त्याला निरोगी माणसांच्या जगात थारा नाही ! कारण हे जग नुसतंच देहानं निरोगी आहे ! मनानं मात्र –

धनंजय : रोहिणी, तू पुरती बरी झालीयस, हे आज लोकांना पटलेलं नसेल, पण उद्या तुझं लग्न झालं, तुला मुलं झाली, की त्यांना ते मानावंच लागेल.

रोहिणी : लग्न ? मुलं ? उगाच खोट्या आशा कशाला ? माझ्या रोगामुळे जिथे मला

साधी होस्टेलमधली जागा मिळू शकत नाही, तिथे माझ्याशी संसार करायला कोण तयार होणार ?

धनंजय : का ? मी शोधीन तुझ्यासाठी एखादा चांगला मुलगा ! मी पटवून देईन त्याची खात्री ! (क्षणभर स्तब्धता.) बोलत का नाहीस रोहिणी ?

रोहिणी : (एकदम संतापून) तुम्ही माझ्यासाठी नवरा शोधाल ? कशाला माझी एवढी काळजी ? यापुढे तुम्ही माझा विचारसुद्धा करू नका. माझी मीच ठरवीन काय करायचं ते !

धनंजय : इतकं चिडायला काय झालं पण तुला ?

रोहिणी : तुम्ही माझे अभिभावक नाही का ? आजवर माझे पालक होऊन काळजीचं नाटक करीत आलात ! पण मी विचारते, त्या नाटकाची गरज काय होती ? आपण कधीच बरे होणार नाही, या खात्रीनं मी चंदनपूरला आले होते – तिथेच राहिले असते – प्रेडनिसोलन घेत राहून जमेल तेवढं आयुष्य तिथेच पडून घालवलं असतं. का तुम्ही मला नसती आशा दाखवलीत ? परत चारचौघींसारखा संसार मांडू शकेन अशी खोटी स्वप्नं मला का दाखवलीत ! मला कुष्ठरोगातून बाहेर काढण्यासाठी स्पर्शच का केलात ? कुठल्या अधिकारानं ?

धनंजय : खरं आहे रोहिणी. तुझ्या आयुष्याचं चांगलं–वाईट काहीच करण्याचा अधिकार मला नव्हता. मी माझ्या कुष्ठसेवेच्या धुंदीत होतो – एक तरी केस बरी व्हायला मी हातभार लावीनच, या कैफात होतो. मी विचार केला तो त्या केसचा – तुझा नाही !

रोहिणी : तुम्ही माझ्यासाठी दुसरा मुलगा शोधाल – म्हंजे मी एके काळी कुष्ठरोग झालेली मुलगी आहे, याची भीती तुम्हालाही वाटते ! मग मोहन, नंदा, वहिनी, विमलाबेन यांच्यात न् तुमच्यात फरक काय राहिला ? तुम्हालासुद्धा खात्री नाही की, मी बरी झाले ! मी चारचौघींसारखी संसार करायला लायक –
(रडत सुटते.)

धनंजय : चूप. एकदम चूप. रडायचं नाही. मी सांगतो ते ऐकून घे आधी. मला खात्री आहे की, तू बरी झालीयस. पण माझं लग्न लागलंय कुष्ठसेवेशी. असल्या माणसाशी तुझा संसार कसा होणार ? माझ्यासारख्या गरीबानं तुझ्याशी लग्न करायचं ठरवणं, हे न परवडणारी स्वप्नं पाहण्यासारखं होईल ! तुझा फायदा घेतल्यासारखं होईल.

रोहिणी : तुम्ही काहीही सांगा, माझा त्यावर विश्वास बसणार नाही. जा तुम्ही – स्वतःच्या वागण्याचं अधिक समर्थन द्यायची गरज नाही. जा. यापुढे मी एकटीच राहीन ! – जा आधी ! माझ्या नजरेसमोरही राहू नका !
(ती खाली कोसळून हुंदके देऊ लागते. तो दाराबाहेर जातो. पण त्याचा पाय

अडतो. क्षणभर तो दारातच उभा राहातो. विचार करीत. त्याच्या मनात येते – )

धनंजयचा आवाज : रोहिणी – कदाचित्, खरंच, तुला वाटतं त्याप्रमाणे, कुणी चांगला माणूस तुझ्याशी लग्न करायला तयार होणार नाही – केवळ आपल्या समाजातल्या अडाणीपणामुळे! गैरसमजामुळे! तू चंदनपूरला परत जाशील. चारचौघांच्या दुनियेचं दार तुला कदाचित् मग कायमचं बंद होईल. लोक म्हणतील की, पाहा, आमचंच खरं ठरलं! वन्स अ लेपर, ऑल्वेज् अ लेपर! माणसाला कुष्ठरोग झाला की, तो कायमचा जगातून उठला! – पण हे खोटं आहे, हे मला कळलंय! कुष्ठरोगी बरा होऊन संसार करू शकतो, मुलामाणसात रमू शकतो – हे मला पटलंय – मीच ते इतरांना पटवायला हवं! माझ्या गरीबीचा बाऊ न करता – मीच पटवायला हवं! रोहिणी, आय कांट लीव्ह यू अलोन!

( तो दारातून आत येतो. रोहिणीजवळ जातो. तिला हाक मारतो – )

धनंजय : रोहिणी – ( ती वर पाहाते. ) रोहिणी – ( तिला उठवीत ) या संन्याशाचा संसार करायला तयार आहेस तू?

( ती त्याच्याकडे पाहातच राहाते.... पाहातच राहाते. मग एकदम धावत जाऊन त्याला गच्च मिठी मारते. )

( पडदा )

( संपूर्ण )

IRBK-0119858

IRBK-0119858

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. १९८५८ नों. दि. १६।५।८३
वि. नाटक क्र.